cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१०९ | बुधवार, दि.१३ ऑगस्ट २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### शिंदे गट बॅकफुटवरच !

महायुती सरकारमधील मंत्र्यांवर झालेले भ्रष्टाचाराचे आरोप,मंत्र्यांचे विविध कारनामे यामुळे महायुती सरकार वर्षाच्या आतच पुरते बदनाम झाले. संजय शिरसाट, योगेश कदम, माणिकाराव कोकाटे, भरत गोगावले आदि मंत्र्यांमुळे सरकारची चांगलीच बदनामी झाली. त्यातच महायुती सरकारमधील तीन पक्षांमध्ये कधी पालकमंत्री तर कधी अधिकार यावरून सातत्याने मतभेद असल्याचे समोर आले, या सरकारमधील मंत्र्यांपेक्षा सरकारचे प्रमुख म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रतिमा मात्र या सगळ्या प्रकरणात चांगलीच मलीन झाली आहे.

### खोक्याचा गांजा वाटपावरून राडा

बीड : येथील जिल्हा कारागृहात गांजा तस्करीचा एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. कारागृहाच्या तटभिंतीवरून बाहेरून गांजा मागवून त्याच्या वाटण्यावरून चार कैद्यांमध्ये तुफान भांडण झाले. ही घटना निदर्शनास आल्यानंतर कारागृह अधिकाऱ्यांनी हस्तक्षेप केला असता, आरोपींनी त्यांनाही शिवीगाळ करत धमक्या दिल्या. या प्रकरणी चार न्यायाधीन बंदींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात भाजपचे आमदार सुरेश धस यांचा कार्यकर्ता खोक्या भोसले याचाही समावेश आहे. ९ ऑगस्ट रोजी सकाळी ११.४५ च्या सुमारास जिल्हा कारागृहातील बॅरेक क्रमांक ४ मध्ये ठेवलेल्या चार कैद्यांमध्ये भांडणे सुरू झाल्याचे सुभेदार बलभीम किसनराव चिंचाणे यांना दिसून आले. त्यांनी तपासणी केली असता, न्यायाधीन बंदी श्याम उर्फ बाळू उत्तम पवार, वसीम खान अफजल खान पठाण, यमराज धरमसिंग राठोड आणि सतीश उर्फ खोक्या निराळ्या भोसले यांच्याकडे गांजासदृश अमली पदार्थ सापडला.

## थोडक्यात...

### पालकमंत्रिपदावर वरिष्ठ जो निर्णय तो मान्य–गोगावले

मुंबई–मी आजही पालकमंत्रिपदावर १०० टक्के ठाम आहे. झेंडावंदन झाल्यानंतर याबद्दल वरिष्ठ निर्णय करतील, असे आम्हाला वाटते. झेंडावंदन करणं आणि पालकमंत्रिपद यात फरक आहे. त्यामुळे यात वरिष्ठ जो काही निर्णय घेतील तो आम्हाला मान्य असेल, अशी प्रतिक्रिया भरत गोगावले यांनी दिली आहे.

### १२ आसनी स्कूल व्हॅनला राज्य सरकारची मंजुरी

मुंबई : स्कूल बसचे वाढीव मासिक दर परवडत नसल्याने आपल्या मुलांच्या वाहतूकीसाठी अनाधिकृत रिक्षाचा पर्याय निवडणाऱ्या राज्यातील तमाम पालकांना दिलासा दिला आहे. १२ सीटर स्कूल व्हॅनला मंजुरी दिल्याची माहिती परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. परिवहन विभागाकडून स्कूल व्हॅन परवाने वाटप खुले करण्यात येत आहेत अशी माहितीही मंत्री प्रताप सरनाईकांनी दिली आहे.

### अभिनेते कदम यांच्या पत्राची फडणवीसांकडून दखल

मुंबई : अभिनेता किशोर कदम यांच्या तक्रारीची मुख्यमंत्री फडणवीस यांनी दखल घेतली आहे. ट्विट करत मुख्यमंत्री फडणवीस यांनी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. सहकार सचिव, एसआयए अधिकाऱ्यांकडे तक्रार दिल्याची माहिती फडणवीसांनी दिली आहे. सोसायटीच्या पुनर्विकासात अन्याय झाल्याचा आरोप किशोर कदमांनी केला होता.

### निधीसाठी मंत्रालयात आमदारांचे हेलपाटे

मुंबई : ठेकेदारांची थकीत देणी, लाडकी बहीण व इतर योजनांसाठी मोठ्या प्रमाणात लागणारा निधी यामुळे राज्याच्या तिजोरीत सध्या खडखडाट निर्माण झाला आहे. याचा फटका राज्यातील सत्ताधारी व विरोधी पक्षातील दोन्ही आमदारांना बसला आहे. हक्काचा आमदार निधी, जिल्हा नियोजन समिती व विविध खात्यांमधील विकास निधी यामधून अक्षरशः गेल्या ९ महिन्यांपासून एकही रुपया न मिळाल्याने निधी मिळवण्यासाठी मंत्रालयामध्ये दररोज आमदारांची धावपळ दिसत आहे.

### स्मार्टफोन नसल्यास मंत्रालयात नो एंट्री?

मुंबई : मंत्रालयात यापुढे स्मार्टफोन असलेल्यांनाच प्रवेश मिळणार आहे. गर्दी रोखण्यासाठी करण्यात आलेले विविध प्रयोग अपयशी ठरत असल्याने आता केवळ डीजी ॲपद्वारे नोंदणी केलेल्या व्यक्तींनाच मंत्रालयात प्रवेश मिळणार आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना मंत्रालयातील प्रवेश दुरापास्त होण्याची शक्यता आहे.

### देशातील ४७६ पींवर टांगती तलवार

नवी दिल्ली : निवडणूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या राजकीय पक्षांना घरचा रस्ता दाखविण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने सफाई अभियान सुरू केले आहे. आयोगाची वक्रदृष्टी आता देशातील ४७६ राजकीय पक्षांवर पडली असून आयोगाने मागच्याच आठवड्यात देशातील ३३४ पक्षांची मान्यता रद्द केली होती.

# शेतकरी मरताय, नेत्यांना जाग कधी येणार?

## एकमेकांच्या जिरवा जिरवीत नेते गुंतले; परिस्थिती काय शेतात जाऊन बघा

**बीड । प्रतिनिधी**

**गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा चांगला पाऊस पडेल या आशेवर असलेल्या शेतकऱ्यांनी शेतीत मोठा खर्च केला. मात्र यंदा मराठवाड्यातील बहुतांश तालुक्यातील तलाव अजूनही जोत्यापर्यंत सुध्दा भरले नाहीत. त्यामुळे यंदा शेतकऱ्यांसाठी अडचणीचे दिवस असून बीड जिल्ह्यातील नेत्यांसह मराठवाड्यातील नेते मात्र एकमेकांची जिरवा जिरवी करण्यात गुंतले असल्याचे चित्र आहे. शेतकऱ्यांवर काय संकट ओढावले आहे, हे बघायचे असेल तर नेत्यांनी थेट शेतीच्या बांधावर जाऊन बघायला हवे, अशी**



मागणी होत आहे.

जगाचा पोशिंदा म्हणून शेतकऱ्यांकडे पाहिले जाते, मात्र सध्या याच पोशिंद्याला जगवण्याची वेळ आली आहे. शेतीत काम करण्यासाठी सध्या शेतकऱ्यांच्या पोरांची सुध्दा तयारी नसून शेतकऱ्यांची मुले शहराकडे वळली आहेत. गेल्या वर्षी चांगला पाऊस झाल्याने शेतीत चांगले उत्पन्न मिळाले होते. यंदा सुध्दा शेतीत बंपर उत्पादन होईल या आशेवर शेतकरी होते. मात्र यंदा जुन आणि जुलै महिन्यात पावसाने दडी मारली. त्यामुळे जे पिक आहे, ते धोक्यात होते. गेल्या आठवडाभरापासून पाऊस सुरु झाला असला तरी सोयाबीन, ऊस, कापूस आणि इतर पिकांमध्ये शेतकऱ्यांना अपेक्षित उत्पादन मिळणार नाही. पिकांची वाढ खुंटली असून काही भागात तर सोयाबीन, कापूस पेरा उशिरा झाला आहे. अशा स्थितीत शेतकऱ्यांना मदतीची गरज असताना ▶▶ पान २ वर

### बीड जिल्ह्यात नेमकं काय चाललयं?

गेल्या काही महिन्यापासून बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना काय अडचणी आहेत? त्यांचे प्रश्न सोडवले जात आहेत की नाही?, पिक विमा मिळत आहे की नाही?, पिककर्ज मिळत आहे की नाही? विज मिळत आहे की नाही?, शेतकऱ्यांच्या मुलांना दर्जेदार शिक्षण मिळत आहे की नाही? या प्रश्नाकडे जिल्ह्यातील नेत्यांचे दुर्लक्ष आहे. एकमेकांची जिरवण्यासाठीच सध्या सगळ्या नेत्यांचा वेळ जात असल्याचे चित्र आहे.



## जिल्हाधिकाऱ्याचा दणका; अडीच हजार जन्म प्रमाणपत्र केली रद्द

**बीड । प्रतिनिधी**

नायब तहसीलदारांनी जारी केलेले उशिराचे जन्म व मृत्यू प्रमाणपत्र मागे घेण्याचे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि नगरपालिका प्रशासनाला दिली आहेत राजकीय तरतुदीनुसार उशिराचे जन्म प्रमाणपत्र देण्यासाठी जिल्ह्यातील सर्व तहसीलदार व कार्यकारी दंडअधिकारी यांना अधिकार देण्यात आले होते मात्र जिल्ह्यातील ६ तहसील कार्यालयात नायब तहसीलदारांनी असे आदेश जारी केल्याचे निदर्शनास आले आहे.

शासनाने ११ ऑगस्ट २०२३ तहसीलदार पदापेक्षा कमी दर्जाचे अधिकारीनि दिलेले सर्व प्रमाणपत्र रद्द करण्याचे सूचना केल्या आहेत वितरित

झालेल्या प्रमाणपत्राची सक्षम अधिकाऱ्याकडून पुन्हा तपासणी करून त्यावर तातडीने निर्णय घेण्याची निर्देश शासनाने दिले आहेत महसुल मंत्राच्या अध्यक्षते खाली झालेल्या व्हिडिओ कॉन्फ्रेसिंगं ठकीत नाय तहसीलदारांनी जारी केलेले सर्व आदेश मागे घेण्याचे आदेश दिले आहे. ▶▶ पान २ वर

### तालुका निहाय यादी

गेवराई १०४०, आंष्टी ६२, माजलगाव २१०, वडवणी १, परळी १३८९, एकूण २७०२

## वैद्यनाथ बँकेवर मुंडे बहिण-भावाचे वर्चस्व

### लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलच्या सर्वच उमेदवारांचा दणदणीत विजय





**परळी वै.। प्रतिनिधी**

**राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांचे वैद्यनाथ अर्बन बँकेवर वर्चस्व कायम राहिले आहे. ना. पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखालील लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलचे सर्वच्या सर्व म्हणजे तेराही उमेदवार मोठया मताधिक्याने निवडून आले आहेत. या निवडणुकीत शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा दारूण पराभव झाला.**

वैद्यनाथ बँक संचालक मंडळाच्या १७ जागांसाठी निवडणूक झाली. या निवडणुकीत ना. पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनल रिंगणात उतरले होते. ▶▶ पान २ वर

### हे आहेत विजयी उमेदवार

आज बीड येथे मतमोजणी प्रक्रिया पार पडली. दुपारी सर्व तेरा जागांचे निकाल हाती आले, यात लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलचे सर्वच्या सर्व उमेदवार मोठया मताधिक्याने निवडून आले. विजयी उमेदवार पुढील प्रमाणे – विनोद सामत, प्रकाश जोशी, डॉ राजाराम मुंडे, संदीप लाहोटी, प्रवीण देशपांडे, महेश्वर निर्मळे, विजय वाककेर, अमोल डुबे, कुलभूषण जैन, राजेंद्र लोमटे, सुशांत लोमटे, मनमोहन कलंत्री, रमेश कराड

## राज्यातील ७ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा सिलसिला सुरूच असून आताही सात अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्याचे आदेश निघाले आहेत. त्यामध्ये डॉ. अशोक करंजकर यांची उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळ सदस्य सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तर संजय कोलते यांची मुंबईतील शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.**

तुकाराम मुंढे यांची दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव म्हणून बदली झाल्यानंतर रिक्त झालेल्या असंघटीत कामगार विकास आयुक्तपदी सुशील खोडवेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यासह एकूण सात आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.

यात डॉ. अशोक करंजकर यांची उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळ, मुंबईचे सदस्य सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. संजय कोलते ▶▶ पान २ वर

## तुळजाभवानी मंदिरात राडा

### जितेंद्र आव्हाड समर्थक अन् सुरक्षा रक्षकांमध्ये धक्काबुक्की





**तुळजापूर । प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी मंगळवारी तुळजापूर येथे आई तुळजाभवानीचे दर्शन घेऊन मंदिराबाबत भूमिका मांडली. त्यानंतर आव्हाड समर्थक आणि सुरक्षा रक्षकांमध्ये धक्काबुक्की झाल्याची घटना घडली.**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी तुळजापूर येथे आई तुळजाभवानीचे दर्शन घेऊन मंदिराबाबत भूमिका मांडली. तुळजाभवानी मंदिराच्या जीर्णोदरातील मंदिराचे शिखर उतरण्याला जितेंद्र आव्हाड यांचा विरोध आहे, त्याच अनुषंगाने आव्हाड यांनी मंदिराला भेट देत पाहणी करुन, देवीचे दर्शन घेऊन आपली भूमिका मांडली. जितेंद्र आव्हाड यांच्या भूमिकेनंतर भाजपकडूनही त्यांच्या वक्तव्याचा निषेध नोंदवत रास्ता रोको आंदोलन करण्यात आले, आव्हाड यांना पुढे न जाऊ देण्याचा इशारा भाजप कार्यकर्त्यांना दिला. त्या पार्श्वभूमीवर तुळजाभवानी मंदिर परिसरात ▶▶ पान २ वर

## पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या तरुणाची आत्महत्या

**बीड । प्रतिनिधी**

पोलीस भरती करीत असलेल्या तरुणाचा गळफास घेतलेल्या अवस्थेत झाडाला लटकलेला मृतदेह आज सकाळी शहरापासून हाकेच्या अंतरावर छत्रपती संभाजी महाराज चौका लगत आढळून आला. मयताचे पाय दोरीने बांधलेली असल्याने ही आत्महत्या की, घातपात असा संशय व्यक्त केला जात आहे. घटनास्थळी बीड ग्रामीण पोलीस दाखल झाले आहेत. गणेश सतीश बहिरवाळ (वय २० वर्ष) रा.अहेर धानोरा (ता.बीड) असे गळफास घेतलेल्या तरुणाचे नाव असून तो पोलीस भरतीची तयारी करीत होता.

प्रशिक्षण घेण्यासाठी तो बीडला अपडाऊन करीत होता. तर सकाळी तो व्याम, धावणे अशी तयारी सुरू होती. आज मंगळवारी (दि.१२) सकाळी त्याचा गळफास घेतलेल्या अवस्थेत मृतदेह सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावर शहरापासून हाकेच्या अंतरावर बायपास रोडवर छत्रपती संभाजी महाराज चौका लगत शेतात एका झाडा लटकलेला आढळला आहे. हा प्रकार वाटसरुंच्या लक्षात येताच त्यांनी पोलीस प्रशासनाला माहिती कळविली माहिती मिळताच बीड ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. मृतदेह ▶▶ पान २ वर

## बीड जिल्ह्यातील तलावाची साडेपाच कोटींची कामे रद्द

### प्रशासनाची दिरंगाई;शेतकऱ्यांमध्ये संताप

**बीड । प्रतिनिधी**

केवळ प्रशासनिक कारणामुळे सन २०२२ मध्ये प्रशासकीय मान्यता दिलेली बीड जिल्ह्यातील पाझर तलाव, गाव तलाव, कोल्हापूर पद्धतीचे बंधारे अशी पाच कोटी ३३ लाख रुपयांची कामे राज्य शासनाने रद्द केली असून गेल्या तीन वर्षापासून याची प्रक्रिया पूर्ण न झाल्याने ही कामे रद्द करण्यात आली आहेत. यातील बरीचशी कामे सुरूही करण्यात आली नव्हती. ही कामे रद्द झाल्याने



शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले असून शासनाच्या विरोधात शेतकऱ्यांकडून संताप व्यक्त केला जात आहे.

बीड जिल्हा हा कायम दुष्काळी ▶▶ पान २ वर

## मांसविक्री बंदी योग्य की अयोग्य

### अजितदादांच्या भूमिकेमुळे नवा पेच

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील विविध ठिकाणी १५ ऑगस्ट रोजी मांसविक्रीवर बंधी घालण्याची निर्णय घेण्यात आला आहे. आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या मुद्द्यावर भाष्य केले आहे. अजितदादांच्या भुमिकेमुळे नवा पेच निर्माण झाला आहे.**

राज्यातील विविध ठिकाणी १५ ऑगस्ट रोजी मांसविक्रीवर बंधी घालण्याची निर्णय घेण्यात आला आहे. कल्याण डोंबिवली, नागपूर, मालेगाव, अमरावती, छत्रपती संभाजीनगरमध्ये ही बंदी



घालण्यात आली आहे. मात्र महापालिकांच्या या निर्णयाचा अनेक लोकांनी विरोध केला आहे. अशातच आता उपमुख्यमंत्री ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१२ ऑगस्ट २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक / आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ९०.०० क्विंटल | २,२९२ | २,८८१ | २,५९६ |
| ज्वारी/हायब्रिड : ९४.५० क्विंटल | १,९०० | २,८७१ | २,४४० |
| मका/लोकल:१.५० क्विंटल | २,१०४ | २,१०४ | २,१०४ |
| तूर : ६.०० क्विंटल | ६,२९१ | ६,४०० | ६,३३० |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ६२.५० क्विंटल | २,०५० | २,७६० | २,५३३ |
| मुग: २.५० क्विंटल | ६,७०० | ७,००० | ६,८५० |
| सोयाबीन: १०४.५० क्विंटल | ४,७५१ | ४,८५० | ४,८१४ |
| हरभरा: ८.५० क्विंटल | ४,८११ | ५,९३१ | ५,३४५ |

## अप्पर पोलीस अधीक्षकांनी केली आरोपीची कारागृहात रवानगी

**बीड । प्रतिनिधी**

**पोलीस आदेशाचा भंग केल्याने पिंपळनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शिवनी येथील एक आरोपीची विशेष कार्यकारी दंडाधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांनी एका आदेशान्वये कारागृहात रवानगी केली.**

दि. १२/०८/२०२५ रोजी विशेष कार्यकारी दंडाधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या आदेशानुसार, एक रिमांड वॉरंट जारी करण्यात आले होते. पो.स्टे. पिंपळनेर येथील कलम १४१ बी.एन. एस. एस. रिपोर्ट प्राप्त झाल्याने सदर रिपोर्टमधील आरोपी पंकज जनार्दन शिंदे वय ३८ वर्ष रा. शिवनी ता.जि. बीड याने यापूर्वी ▶▶ पान २ वर

## एकाच दिवसात अदानींनी कमावले ५.७४ अब्ज डॉलर्स

### अब्जाधिशांच्या यादीत टॉप २० मध्ये समावेश

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

**शेअर बाजारातील वाढीचा सर्वाधिक फायदा उद्योगपती गौतम अदानी यांना झाला आहे. त्यांच्या संपत्तीत फक्त एका दिवसात ५.७४ अब्ज डॉलर्सची वाढ झाली आहे. तसेच अब्जाधिशांच्या यादीत टॉप २० मध्ये त्यांचा समावेश झाला आहे.**

सलग सहा आठवडे सुरु असलेली शेअर बाजारातील घसरण ८ ऑगस्ट रोजी थांबली. या दिवशी सेन्सेक्स ७४६.२९ अंकांच्या वाढीसह ८०६०४.०८ अंकांवर बंद झाला. त्याच वेळी, निफ्टी २२१.७५ अंकांनी वाढल्यानंतर २४५८५.०५ अंकांवर बंद झाला. शेअर बाजारातील वाढीचा सर्वाधिक फायदा उद्योगपती गौतम अदानी यांना झाला आहे. त्यांच्या संपत्तीत फक्त एका दिवसात ५.७४ अब्ज डॉलर्सची वाढ झाली आहे. शेअर बाजारातील या तेजीचा सर्वाधिक फायदा उद्योगपती गौतम अदानी यांना झाला. फक्त एका दिवसात त्यांची संपत्ती ५.७४ अब्ज डॉलर्स (५,०३, ०१, ९१,८८,७००) ने वाढली. यासह, ▶▶ पान २ वर

### अब्जाधिशांच्या यादीत अंबानींचा कितवा क्रमांक?

अब्जाधिशांच्या यादीत मुकेश अंबानी १८ व्या क्रमांकावर आहेत. त्यांनी एका दिवसात १.४० अब्ज डॉलर्सची कमाई केली आहे. सध्या त्यांची एकूण संपत्ती ९९.५ अब्ज डॉलर्स आहे. कमाईच्या बाबतीत फक्त एलोन मस्क अदानींपेक्षा पुढे आहेत. ६.६९ अब्जच्या वाढीसह, ते जगातील टॉप २० श्रीमंत व्यक्तींच्या यादीत पहिल्या क्रमांकावर आहेत.

cmyk

## अग्रलेख

# शिंदे गट बॅकफुटवरच !

महायुती सरकारमधील मंत्र्यांवर झालेले भ्रष्टाचाराचे आरोप,मंत्र्यांचे विविध कारनामे यामुळे महायुती सरकार वर्षाच्या आतच पुरते बदनाम झाले. संजय शिरसाट, योगेश कदम, माणिकाराव कोकाटे, भरत गोगावले आदि मंत्र्यांमुळे सरकारची चांगलीच बदनामी झाली. त्यातच महायुती सरकारमधील तीन पक्षांमध्ये कधी पालकमंत्री तर कधी अधिकार यावरून सातत्याने मतभेद असल्याचे समोर आले, या सरकारमधील मंत्र्यांपेक्षा सरकारचे प्रमुख म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रतिमा मात्र या सगळ्या प्रकरणात चांगलीच मलीन झाली आहे. दिल्लीत एकीकडे खासदारांनी निवडणूक कार्यालयावर मोर्चा काढलेला असताना, महाराष्ट्रात शिवसेना ठाकरे गटाने जनआक्रोश मोर्चाच्या माध्यमातून सरकारविरोधात जोरदार शक्तीप्रदर्शन केले.

उध्दव ठाकरे यांना राहुल गांधी यांच्या निवासस्थानी शेवटच्या रांगेत बसवल्याने बाळासाहेबांच्या स्मृतीस्थळावर जाऊन शिवसेना शिंदे गटाच्या नेत्यांनी बाळासाहेब आम्हाला माफ करा असे म्हणत माफी मागितली, आज तिथेच हाकेच्या अंतरावर उध्दव ठाकरे यांनी शाहू, फुले, आंबेडकरांचा महाराष्ट्र नेहमी महाराष्ट्र देशाला दिशा दाखवतो. असा गौरवशाली आपला महाराष्ट्र या सरकारने भ्रष्टाचाराच्या रांगेत एक नंबरला नेला आहे, विकास आणि नितीमत्ता पाहिली तर महाराष्ट्र शेवटच्या रांगेत आहे, असे म्हणत चार दिवसापूर्वी आंदोलन करणाऱ्या शिंदे गटाला चांगलेच शालजोडीतले दिले.

कोणाला कुठे बसवले यापेक्षा महाराष्ट्र राज्य कितव्या रांगेत हे सांगत ठाकरे यांनी कोणाचे नाव न घेता बोचरी टीका केली. महायुती सरकारकडे स्पष्ट बहुमत आहे, मात्र सरकारमधील तीन पक्षांमध्ये आलबेल नसल्याने विशेषत: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात असलेल्या सुप्त संघर्षात सरकारची रोज कोंडी होताना दिसत आहे. एकनाथ शिंदे यांना पुन्हा राज्याचे मुख्यमंत्री व्हायचे आहे, मात्र भाजपकडून त्यांना प्रतिसाद मिळत नाही. शिंदे यांना मुख्यमंत्री करण्याचे आश्वासन दिल्याचे काही शिवसेनेचे नेते सांगतात, मात्र शिंदेंनी तसे अजुन जाहीरपणे सांगितलेले नाही. त्यामुळे शिंदे गटातील मंत्री आणि आमदार हे सातत्याने सरकार विरोधी कारवाया करत असल्याचे देखील बोलले जात आहे. फडणवीस हे राजकारणात चांगले मुरलेले आहेत, भाजपांर्तगत विरोधकांना त्यांनी मुख्यमंत्री पदाच्या पहिल्याच टर्ममध्ये शांत केले. मात्र एकनाथ शिंदे यांचा स्वतंत्र पक्ष असल्याने तसेच २०२२ ला उध्दव ठाकरे यांचे सरकार घालवण्यात, तसेच शिवसेना फोडण्यात शिंदे यांनी घेतलेली रिस्क त्यामुळे शिंदे यांना भाजपचे वरीष्ठ नेते अमित शहा यांचा थेट ॲक्सेस आहे. याचाच फायदा घेत शिंदे यांनी भाजपातील दिल्लीतील वर्तुळात आपली जागा करण्याचा सातत्याने प्रयत्न केला. लोकसभा आणि विधानसभा निवडणूक महायुती म्हणून शिवसेना भाजपने एकत्र लढविली. विधानसभा निवडणूकीत महायुती राज्यात बहुमताने सत्तेवर आली, लाडकी बहीण योजना आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात हा विजय मिळाल्याचे सांगत शिवसेनेने मुख्यमंत्री पदासाठी दावा केला. मात्र भाजपने शिंदे यांना ना गृहमंत्री खाते दिले ना मुख्यमंत्री, त्यानंतर शिवसेना आणि भाजपात कधी पालकमंत्री तर कधी अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या तर कधी लाडक्या बहीण योजनेसाठी वळवलेला निधी यावऊन वाद होत होते. पावसाळी अधिवेशन काळातच शिंदे गटाच्या मंत्र्यांचे आणि आमदारांचे कारनामे बाहेर आल्याने पावसाळी अधिवेशनात शिंदे गटाची चांगलीच कोंडी झाली. पावसाळी अधिवेशनात

बॅकफुटवर गेलेले एकनाथ शिंदे हे अजुनही बॅकफुटवर आहेत, त्यात भर पडली ती ठाकरे बंधूंच्या मनोमिलनाची. त्यामुळे शिंदे गट हा कधी पक्ष आणि चिन्हाच्या निकालामुळे तर कधी पक्षाच्या विलीनीकरणाच्या चर्चेने अस्वस्थ दिसत आहे. दुसरीकडे शिंदे गटाच्या मंत्र्यांवर झालेल्या आरोपानंतर शिवसेना ठाकरे गट आक्रमक झाला आहे. सरकारमधील भ्रष्ट आणि कलंकित मंत्र्यांचा राजीनामा घेण्यासाठी मुख्यमंत्री आणि राज्यपालांना देखील शिवसेना ठाकरे गटाचे आमदार भेटले, मात्र काहीही उपयोग होईना, ऐन अधिवेशन काळात गुरूपौर्णिमेपासून शिंदेंच्या दिल्लीवारी सुरू झाल्या आहेत. त्या वाऱ्या सुरूच असून शिंदे यांना दिल्लीश्वरांकडून ठोस आश्वासन मिळत नसल्याचे बोलले जात आहे. महायुतीकडे स्पष्ट बहुमत आहे. गेली दोन अधिवेशन विरोधीपक्ष नेता नाही, तरी केवळ मित्रपक्षांमध्येच सुरू असलेल्या राजकारणामुळेच सरकारची रोज कोंडी होताना दिसत आहे. त्यातच राहुल गांधी यांनी विधानसभा आणि लोकसभा निवडणूकीतील मतदानाबाबत उपस्थित केलेल्या शंकांबाबत देशात भाजपविरोधी वातावरण तयार झालले आहे.

शरद पवार आणि संजय राऊत यांनी १६० जागांसाठी केलेल्या गौफ्यस्फोटामुळे सरकारची कोंडी झाली आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीत एकवाक्यता नाही, त्यातच ठाकरे यांच्या शिवसेनेने सरकार विरोधात उभे केलेले जनआक्रोश आंदोलन आणि आंदोलनात स्वत: उध्दव ठाकरे यांनी रस्त्यावर उतरणे ही सरकारला धोक्याची घंटा आहे. जेव्हा जेव्हा सरकारच्या विरोधात कोणी मोठे आंदोलन उभे करतो तेव्हा मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस हे त्या आंदोलनाची किंवा मोर्चाची एक तर दखल घेत नाहीत किंवा सरकार म्हणून आंदोलनाची तीव्रता लक्षात घेता वेळीच निर्णय घेताना दिसले.

ठाकरे यांचे आंदोलन यशस्वी होणे हे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका बघता एकनाथ शिंदे यांच्यासाठी धोकादायक आहे. एकीकडे दिल्लीत निवडणूक आयोगाच्या कार्यालयावर विरोधी पक्षाच्या सर्व खासदारांनी काढलेला मोर्चा, त्यात उपराष्ट्रपती धनखड यांच्या राजीनाम्यानंतर त्यांच्याबाबबत तयार झालेले संशयाचे धुके, त्यातच मित्रपक्षांच्या भ्रष्ट मंत्र्यांच्या कारनाम्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे कुठेतरी बदनाम होत आहेत. फडणवीस हे चिफ मिनिस्टर नाही तर थिफ मिनिस्टर असल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात असल्याने आता मुख्यमंत्री फडणवीस विरोधकांच्या या आरोपांना कसे उत्तर देतात हे बघणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# बीड एसटी विभागात मोठा भ्रष्टाचार उघड ?

**३५,००० ते ५०,००० मध्ये नेमणुकींचा सौदा, सेवाज्येष्ठतेचे नियम धाब्यावर–सरवदे**

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बीड विभागात सेवाज्येष्ठतेचे नियम, शासन परिपत्रके आणि बदली अधिनियम २००५ चे उघड उल्लंघन करत भ्रष्टाचाराचा मोठा खेळ उघड झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या स्पष्ट निर्देशांनुसार खुल्या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना केवळ तात्पुरती बढती देण्यात यावी, असे आदेश असताना देखील बीड विभाग नियंत्रक सौ. अनुजा दुसाने आणि पवार यांनी संगनमत करून मनमानी नेमणुका केल्याचा आरोप जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी (पश्चिम) अजय सरवदे यांनी केला आहे.

संपूर्ण प्रकार १७ सप्टेंबर २०२० रोजी महामंडळाने जारी केलेल्या पत्र क्र. राप/कर्मवर्ग/म.व./२४९८ मध्ये ८ सप्टेंबर २०१७ च्या परिपत्रकानुसार कर्मचाऱ्यांची सेवाज्येष्ठता मूळ नेमणुकीच्या तारखेपासून ग्राह्य धरण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या होत्या. मात्र, या आदेशांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून, तात्पुरती बढती घेतलेल्या कर्मचाऱ्यांची नेमणूक सेवाज्येष्ठतेनुसार न करता पैशांच्या देवाणघेवाणीतून करण्यात आली. चौकशीत उघड झाले की, विभागीय कार्यालयात ३५,००० ते ५०,००० दराने नेमणुकींचे सौदे झाले. हा प्रकार पवार नावाच्या जातीयवादी कर्मचाऱ्याच्या पुढाकाराने झाला असून, विभाग नियंत्रक सौ. अनुजा दुसाने यांनी त्यात सक्रिय सहभाग घेत आर्थिक हिस्सा उचलल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. विभागीय कार्यालय बीड येथे सेवा जेष्ठतेचे नियम मोडून पदभार वितरण, डेपो आणि विभागीय कार्यालयात बिंदूनामावलीप्रमाणे अधिकारी–कर्मचारी नियुक्त न करणे, बदली अधिनियम २००५ चे उघड उल्लंघन, शासन परिपत्रक व सेवाज्येष्ठतेची नियमावली पूर्णपणे दुर्लक्षित अजय सरवदे यांची ठाम मागणी या भ्रष्टाचार प्रकरणाची तातडीने सखोल चौकशी, दोषींवर विभागीय आणि कायदेशीर कारवाई, सर्व अनियमित नेमणुका व बदली आदेश रद्द करून सेवाज्येष्ठतेनुसार नव्याने नेमणुकी. ‘‘हे प्रकरण केवळ नियमभंग नाही, तर पैशांच्या लोभापायी सरकारी व्यवस्थेवर केलेला उघड दरोडा आहे. आम्ही हे प्रकरण शांत बसून पाहणार नाही,‘‘ असा इशारा श्री. सरवदे यांनी दिला आहे.

# अंगणवाडी कार्यकर्ती बडतर्फीचे आदेश उच्च न्यायालय खंडपीठाकडून रद्द

जालना । प्रतिनिधी



**तीन आपत्य असल्याच्या तक्रारीवरून कंडारी काकडे ता. घनसावंगी येथील अंगणवाडी कार्यकर्तीच्या बडतर्फीचे आदेश उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने रद्द ठरविले आहेत.**

कंडारी काकडे येथील अंगणवाडी कार्यकर्ती पुष्पा काकडे यांना तीन अपत्य असल्याच्या कारणावरून त्यांचे पद रद्द करावे अशी तक्रार काही ग्रामस्थांनी जिल्हा परिषद प्रशासनाकडे केली होती. त्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सेवा समाप्तीचे आदेश दिले होते. या निर्णयाविरुद्ध पुष्पा काकडे यांनी विभागीय आयुक्तांकडे धाव घेतली. विभागीय आयुक्तांनी सुद्धा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश कायम ठेवत पुष्पा काकडे यांच्या सेवा समाप्ती बाबत बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांना आदेश दिले होते. शेवटी पुष्पा काकडे यांनी या निर्णयाविरुद्ध उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात आव्हान याचिका दाखल केली. दोन्ही बाजूंचे युक्तिवाद आणि पुराव्यांचे अवलोकन केल्यानंतर ‘‘अंगणवाडी कार्यकर्ती पुष्पा काकडे यांची आपत्य २००५ पुर्वीची असल्याने त्यांना लहान कुटुंबाची अट लागू होत नाही‘‘ असे मत न्यायाधीशांनी नोंदवले. मुख्य कार्यकारी अधिकारी आणि विभागीय आयुक्तांचे आदेश रद्द ठरवत अंगणवाडी कार्यकर्ती पुष्पा काकडे यांना परत मूळ पदावर सामावून घेण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. अर्जदारांच्या वतीने ॲड. महेश काळे यांनी बाजू मांडली. या निर्णयामुळे गावपातळीवरील गटबाजीतून होत असलेल्या त्रासापासून अंगणवाडी कार्यकर्तींना दिलासा मिळाला आहे.

# बीड शहर पोलिसांनी आणखी एक मोटर सायकल चोर पकडला

**२४ तासात पीडीतास मोटरसायकल केली परत**

बीड । प्रतिनिधी

शहर पोलिसांनी गेल्या सात दिवसात पुन्हा एक मोटरसायकल चोर पकडला असून त्याच्याकडून चोरीस गेलेली मोटरसायकल ही परत मिळवली आहे. दि.०८/०९/२०२५ रोजी फिर्यादी श्रीराम नवनाथ भिसे मुक्काम पोस्ट तांदुळवाडी भिल्ल, मोटरसायकल अज्ञात चोरट्याने सुभाष रोडवरील सहेली या दुकानासमोरून चोरून नेल्याची तक्रार बीड शहर पोलीस ठाण्यात दाखल झाली होती.




मोटरसायकल चोरी होत असल्याची दखल या अगोदरच पोलीस अधीक्षक नवनीत कावत साहेब यांनी घेतलेली आहे व त्यांनी सर्व पोलिसांना याबद्दल काम करण्याचे सूचना दिले आहेत. या अनुषंगाने बीड शहर पोलीस सदैव कामगिरी करत आहे. अशा प्रकारची मोटर सायकल चोरी गेली आहे याची माहिती सोशल मीडिया वरून देण्यात आली होती. त्यातून टाकरवन तालुका माजलगाव या गावात अशोक मधुकर गरड वय ३२ वर्ष धंदा मजुरी, या माणसाने त्या वर्णनाची मोटर सायकल आणली आहे अशी त्या गावातून माहिती मिळाली होती. सोशल मीडियाचा यामुळे अशा प्रकारे चांगला उपयोग झाला असून या माध्यमातून या चोरास अटक करण्यात आली आहे आणि त्याच्याकडून चोरीस गेलेली मोटरसायकल जप्त करण्यात आली आहे. २४ तासात अशा प्रकारची मोटरसायकल जप्त करून ती फिर्यादी यांस आज दिनांक १२ ऑगस्ट रोजी परत केली आहे. यामुळे फिर्यादीने पोलीस अधीक्षक नवनीत कावत आणि पथकाचे आभार मानले आहे. पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अपर पोलीस अधीक्षक श्री सचिन पांडकर, यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस ठाणे बीड शहरचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ साहेब, पोलीस उपनिरीक्षक महेश जाधव, पोह गहिनीनाथ बावनकर, पो.अं. राम पवार आणि मंगेश शिंदे यांनी वेगवान कारवाई करून पिडीताला दिलासा दिला आहे.

# जालना जिल्ह्याचे भूमिपुत्र सांगलीचे सहाय्यक पोलीस आयुक्त

जालना । प्रतिनिधी



जालना जिल्ह्याचे भूमिपुत्र आहे जालना जिल्ह्यातील मौजे नेर येथील एका शेतकरी कुटूंबात जन्म घेतलेल्या श्री. प्रभाकर उफाड यांना महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाने पोलीस निरीक्षक पदावरून पदोन्नती दिली असून ते आता सांगलीचे नवे सहाय्यक पोलीस आयुक्त म्हणुन काम पाहणार आहेत. सन. १९९५ मध्ये महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगातर्फे पोलीस उपनिरीक्षक म्हणुन निवड झाल्यानंतर श्री. प्रभाकर उफाड यांनी महाराष्ट्रातील सोलापूर, सातारा, जळगाव, पुणे, मुंबई आदी ठिकाणी विविध पदावर आपली सेवा बजावली. नुकतेच महाराष्ट्र शासनाने वरीष्ठ पोलीस निरीक्षकांना पदोन्नती देवून सहाय्यक पोलीस आयुक्त म्हणुन बढती दिली आहे. दरम्यान, श्री. प्रभाकर उफाड हे नेरचे माजी सरपंच श्री. मुरलीधर उफाड, रामराव उफाड, निळकंठ उफाड यांचे लहान बंधू असून त्यांच्या या यशाबद्दल संपूर्ण जालना जिल्ह्यात त्यांचे कौतुक होत.

# वैद्यनाथ बँकेचे विजयी उमेदवार गोपीनाथ गडावर नतमस्तक; डॉ.प्रीतमताई मुंडेंनी केला सत्कार

**यश:श्रीवर प्रज्ञाताई मुंडे यांनी पेढा भरवून केले सर्व विजयी संचालकांचे अभिनंदन**

परळी वै.। प्रतिनिधी

**वैद्यनाथ अर्बन बँकेच्या निवडणुकीत दणदणीत विजय संपादन केलेले सर्वच्या सर्व विजयी उमेदवारांनी आज संध्याकाळी गोपीनाथ गडावर येऊन लोकनेते मुंडे साहेबांच्या समाधीचे दर्शन घेतले. याठिकाणी डॉ प्रीतमताई मुंडे यांनी सर्वांचा सत्कार केला तर यश:श्री निवासस्थानी प्रज्ञाताई मुंडे यांनी सर्वांचे पेढा भरवून अभिनंदन केले.**

वैद्यनाथ बँकेच्या निवडणुकीचा निकाल आज जाहीर झाला. सर्वच्या सर्व १७ संचालक यात मोठे मताधिक्य घेऊन विजयी झाले. ना. पंकजाताई मुंडे यांचे या बँकेवर पुन्हा एकदा वर्चस्व कायम राहीले. निकालानंतर बँकेचे अध्यक्ष विनोद सामत, उपाध्यक्ष रमेश कराड यांच्यासह सर्व संचालकांनी गोपीनाथ गडावर नतमस्तक होऊन मुंडे साहेबांच्या समाधीचे दर्शन घेतले. या निवडणुकीत बिनविरोध निवडून आलेल्या संचालिका व माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांनी याठिकाणी सर्वांचे पुष्पहार घालून स्वागत केले. यानंतर हया सर्व उमेदवारांनी यश:श्री निवासस्थानी येऊन प्रज्ञाताई मुंडे यांची भेट घेतली व आभार मानले. प्रज्ञाताई मुंडे यांनी प्रत्येक विजयी उमेदवाराला स्वतःच्या हाताने पेढा भरवून सर्वांचे अभिनंदन केले. सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.



## पान १ वरून...

### शेतकरी मरतोय, नेत्यांना

बीड जिल्ह्यातील व मराठवाड्यातील नेते मात्र एकमेकांची जिरवण्यात गुंतले आहे. शेतकऱ्यांची परिस्थिती काय आहे? हे जाणून घेण्याची गरज सुध्दा या नेत्यांना वाटत नसल्याचे चित्र आहे. शेतकरी एकीकडे मरण यातना भोगत असताना राजकारण करण्यातच नेते मंडळी धन्यता मानत असेल तर शेतकऱ्यांचे कल्याण कसे होणार? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

------------

### वैद्यनाथ बँकेवर पंकजाताई

या पॅनलच्या चार जागा या अगोदरच बिनविरोध निवडून आल्या आहेत, त्यात माजी खासदार डॉ.प्रीतमताई मुंडे, अनिल तांदळे, डॉ.विनोद जगतकर आणि माधुरी मेनकुदळे यांचा समावेश होता. संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी परळीपासून मुंबईपर्यंतच्या ३६ मतदान केंद्रावर शनिवारी मतदान पार पडले. एकूण ४३ हजार ९६२ मतदारसंख्येपैकी १६ हजार २८७ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला, एकूण मतदानाची टक्केवारी ३७.५ इतकी नोंदवली गेली होती.

--------------

### जिल्हाधिकाऱ्याचा दणका अडीच

त्या अनुषंगाने नायब तहसीलदार आणि त्यांच्या कार्यक्षेत्रातील दिलेली प्रमाणपत्रे तसेच शासनाचे पत्रा नुसार रद्द करण्यात आलेले मूळ आदेश १० ऑगस्ट २०२५ पर्यंत परत घेऊन त्याचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालय सादर करावा असेही निर्देश देण्यात आले आहे.

----------

### पोलीस भरतीची तयारी

शवविच्छेदनासाठी बीड जिल्हा रुग्णालयात आणण्यात आला. पण मयताचे पाय दोरीने बांधलेली असल्याने हा प्रकार नेमका काय? आत्महत्या की, घातपात असा संशय व्यक्त केला जात आहे. पोलीस पुढील तपास करीत असून तपासात नेमकं कारण स्पष्ट होईल.

-------------

### तुळजाभवानी मंदिरात राडा

पोलीस बंदोबस्त वाढवला होता. जितेंद्र आव्हाड मंदिरात दाखल झाल्यानंतर राजे शहाजी महाद्वारातून त्यांनी पाहणी केली. त्यानंतर, मदिरात प्रवेश केल्यानंतर त्यांचे कार्यकर्ते आणि सुरक्षारक्षक यांच्यात गोंधळ उडाल्याचं पाहायला मिळाले. जितेंद्र आव्हाड यांना मंदीरात सोडलेल्या ठिकाणाहूनच आम्हालाही आत सोडण्यात यावे, असे म्हणत मंदिरात जाण्यासाठी कार्यकर्ते व पदाधिकारी यांची गर्दी झाली होती. मंदिरातील सुरक्षारक्षक व आव्हाड यांच्या कार्यकर्त्यांत बाचाबाची देखील झाली होती, विशेष म्हणजे आ. आव्हाड मंदीरात पाहणी करत असल्याने भाविकांची दर्शन लाईन थांबवली, त्यामुळे मोठी गर्दी झाल्याचे सांगण्यात आले. दुसरीकडे भाजप कार्यकर्ते आणि जितेंद्र आव्हाड यांच्या समर्थक कार्यकर्त्यांमध्येही धक्काबुकी झाल्याने तुळजाभवानी मंदिरासमोर प्रचंड गोंधळ उडाला होता, काही वेळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. भाजप कार्यकर्त्यांनी जितेंद्र आव्हाड यांच्या गाडीसमोर ठिय्या मांडला, जितेंद्र आव्हाड यांनी हिंदूंच्या भावना दुखावल्या आहेत, आम्ही कोणत्याही परिस्थितीत त्यांना जाऊ देणार नाही, अशी भूमिका भाजप समर्थकांनी घेतली होती. जितेंद्र आव्हाड यांनी माफी मागावी अन्यथा आम्ही उठणार नाही, आव्हाड यांनी आई तुळजाभवानी मंदिरातील कळस काढण्यासंदर्भाने वादग्रस्त वक्तव्य केल्याचंही भाजप कार्यकर्त्यांनी म्हटले. दरम्यान, कोणत्याही परिस्थितीत तुळजाभवानी मंदिराच्या गाभाऱ्याला हात लावू देणार नाही, ज्या पायऱ्यांवरून छत्रपती शिवाजी महाराज गेले त्या पायऱ्या आणि देवीच्या गाभाऱ्याला हात लावू देणार नाही, अशी भूमिका जितेंद्र आव्हाड यांनी घेतली आहे.

-------------

### राज्यातील ७ आयएएस

जिल्हाधिकारी, भंडारा यांची शिवशाही पुनर्वसन प्रकल्प, मुंबईचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सुशील खोडवेकर सदस्य सचिव, उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळ, मुंबई यांना विकास आयुक्त (असंघटित कामगार), मुंबई म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सावन कुमार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांची जिल्हाधिकारी, भंडारा म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नमन गोयल प्रकल्प अधिकारी, भामरागड आणि सहाय्यक जिल्हाधिकारी, अटापली उपविभाग, गडचिरोली यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. डॉ.जी.व्ही.एस. पवनदत्त सहाय्यक जिल्हाधिकारी, देसाईगंज उपविभाग, गडचिरोली यांची सहायक जिल्हाधिकारी, इगतपुरी उपविभाग, नाशिक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. लघिमा तिवारी सहायक जिल्हाधिकारी, बल्लारपूर उपविभाग, चंद्रपूर यांची सहायक जिल्हाधिकारी, गोंडपिंपरी उपविभाग, चंद्रपूर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या आधी गेल्या आठवड्यातच पाच आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये तुकाराम मुंढेंचाही समावेश आहे.

---------------

-----------------

### बीड जिल्ह्यातील तलावाची

भाग म्हणून गणला जातो. या जिल्ह्यामध्ये तलावाच्या माध्यमातून शेती समृद्ध व्हावी यासाठी जिल्ह्यातील पाटोदा शिरूर, गेवराई, माजलगाव ,बीड, धारूर , अंबाजोगाई आदी तालुक्यामध्ये कोल्हापूर पद्धतीचे बंधारे ,पाझर तलाव, गाव तलाव अशी जवळपास ५ कोटी ३३ लाख रुपयांची कामे सन २०२२ मध्ये मंजूर करण्यात आली होती. या कामाला प्रशासकीय मान्यताही देण्यात आली होती. मात्र या कामात दिरंगाई झाल्याचे कारण दाखवत राज्य शासनाने ही कामे रद्द ठरवली आहेत. यामध्ये बीड तालुक्यातील उंमरी कोल्हापूर पद्धतीचा बंधारा एक कोटी ३१ लाख रुपये, नागापूर बुद्रुक कोल्हापूर पद्धतीचा बंधारा एक कोटी ४४ लाख रुपये, वंजारवाडी गाव तलाव १९ लाख रुपये ,आष्टी तालुक्यातील पांगरा पाझर तलाव २४ लाख ,गंगादेवी पाझरतालाव वीस लाख, घाटा पाझर तलाव ३५ लाख ,जोगेश्वरी पारगाव पाझर तलाव २५ लाख ,माजलगाव तालुक्यातील बाहेगव्हाण गाव तलाव सात लाख ,धारूर तालुक्यातील आंबा चौंडी कोल्हापूर पद्धतीचा बंधारा तीन लाख ,अंबाजोगाई तालुक्यातील पुस गाव तलाव २० लाख, पाटोदा तालुक्यातील करंजवण पाझर तलाव साडेतीन लाख, नाळवंडी सस्ते वस्ती पाझर तलाव सहा लाख, बांगरवाडी पाझर तलाव २६ लाख, शिरूर तालुक्यातील नागरेचीवाडी पाझर तलाव अठरा लाख भोकरवाडी पाझर तलाव साडेआठ लाख, येवलवाडी जानपीरवाडी पाझर तलाव सात लाख, गेवराई तालुक्यातील खळेगाव कोल्हापूर पद्धतीचा बांधणारा ३६ लाख आदी कामे राज्य शासनाने रद्द ठरवली आहेत. ही कामे रद्द झाल्याने अनेक भागांमध्ये त्याचा शेतकऱ्यांना फायदा होणार होता. मात्र लाल फितीच्या कारभारामुळे ही कामे रखडल्याचे सांगण्यात येते. चूक प्रशासनाची असली तरी त्याचे परिणाम शेतकऱ्याला भोगावे लागतात. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड संताप व्यक्त केला जात आहे.

--------

### अप्पर पोलीस अधीक्षकांनी केली

केलेल्या कलम १२६ बी.एन. एस. एस. प्रमाणे सार्वजनिक शांतता राखण्यासाठी दिलेल्या अंतिम बंध पत्राचा भंग केल्याने त्याच्याविरुद्ध कलम १४१ बी.एन. एस. एस. प्रमाणे कारवाई करून त्यास उर्वरित कालावधीसाठी त्याची रवानगी जिल्हा कारागृह बीड येथे करण्याचे आदेश विशेष कार्यकारी दंडाधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांनी केले आहेत.

-----------

### मांसविक्री बंदी योग्य

अजित पवार यांनीही या मुद्द्यावर भाष्य केले आहे. अजित पवार आज पत्रकारांशी संवाध साधत होते. यावेळी त्यांना मांसविक्रीवरील बंदीबाबत प्रश्न विचारण्यात आला होता. यावर बोलताना अजित पवार म्हणाले की, मी पण ती बातमी टीव्हीवर पाहिली. आता खरं तर श्रद्धेचा प्रश्न असतो त्यावेळी अशा प्रकराची बंदी घातली जाते. राज्यात काही जण शाकाहारी, काही मांसाहारी आहेत. कोकणात साधी भाजी करताना नॉनव्हेज असते, तो त्यांचा आहार आहे. अजित पवारांच्या या भूमिकेनंतर आता राज्य सरकार याबाबत काय निर्णय घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मांस विक्रीवरील बंदी उठवायची की तशीच ठेवायची असा पेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समोर उभा राहिला आहे. त्यामुळे मुख्यमंत्री फडणवीस काय निर्णय घेणार हे महत्वाचे ठरणार आहे.

-------------

### एकाच दिवसात अदानींनी कमावले

त्यांची एकूण संपत्ती ७९.७ अब्ज डॉलर्स झाली आणि ते ब्लूमबर्ग अब्जाधीश निर्देशांकातील टॉप २० श्रीमंतांच्या यादीत परतले. गौतम आदनी यांच्याबरोबरच अन्य भारतीय अब्जाधिशांच्या संपत्तीत देखील वाढ झाली आहे. अब्जाधिशांच्या यादीत मुकेश अंबानी १८ व्या क्रमांकावर आहेत. त्यांनी एका दिवसात १.४० अब्ज डॉलर्सची कमाई केली आहे. एचसीएलचे संस्थापक शिव नाडर हे देखील अब्जाधिशांच्या यादीत ५६ व्या क्रमांकावर आहेत. शेअर बाजारातील तेजीचा मोठा फायदा झाल्याचे पाहायाल मिळत आहे.

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार दि. १३ ऑगस्ट २०२५ | ३

## धान्य दुकानदारांनी अनियमितता केल्यास कारवाई –चौधर


जालना : रास्त भाव दुकानामध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता होणार नाही याबाबत जालना जिल्ह्यातील सर्व रास्तभाव दुकानदारांनी दक्षता घ्यावी, तसेच नियमित धान्य वाटप करण्याबाबत उचित कार्यवाही करावी. स्वस्त धान्य दुकानदारांनी अनियमितता केल्यास महाराष्ट्र अनुसूचित वस्तु (वितरणाचे विनियमन) आदेश, १९७५ अन्वये कारवाई करण्यात येईल, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे. रास्त भाव दुकानामध्ये नियमित अन्नधान्य वाटप न करणे, धान्याची पावती न देणे, दुकान वेळेत सुरु न ठेवणे, नोंदवह्या नसणे, दर्शनिय भावफलक नसणे आदि गंभीर त्रुटी तपासणीदरम्यान आढळुन आल्या आहेत. महाराष्ट्र अनुसूचित वस्तु (वितरणाचे विनियमन) आदेश, १९७५ मधील नियम ३ (क) अंतर्गत जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर यांनी जालना तालुक्यातील कुंभेफळ येथील रास्त भाव दुकानदार गणेश श्रीमंत गवारे यांचे दुकान क्र.१०५ चे प्राधिकारपत्राची १०० टक्के अनामत रक्कम जप्त करुन प्राधिकारपत्र रद्द करण्यात आले. यावेळी सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी प्रकाश जाधव, निरीक्षण अधिकारी व इतर कर्मचाऱ्यांनी रास्तभाव दुकानाची तपासणी केली व प्रत्यक्ष स्थळपाहणी करुन ग्रामस्थांच्या समस्या जाणून घेतल्या.

# थोडक्यात....

## सावळारामपंत जोशी यांचे निधन

माजलगांव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोगरा येथील प्रतिष्ठीत शिक्षक सावळारामपंत जोशी यांचे दि १२ ऑगस्ट मंगळवार रोजी वृद्धापकाळाने माजलगांव येथे दुःखत निधन झाले आहे. मयत प्रतिष्ठीत शिक्षक सावळाराम पंत जोशी हे सिध्देश्वर विद्यालय माजलगांव शिशुविवारचे प्रमुख लक्ष्मीकांत जोशी मोगरेकर,इजि सतिशराव जोशी मोगरेकर,व श्रीनिवास जोशी मोगरेकर याचे ते वडील होते.त्यांच्यावर मंगलनाथ स्मृशानभुमी मध्ये सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले.



## बीड-पुणे लालपरी बस अंमळनेर मार्गे चालू ठेवण्याची मागणी

पिंपळवंडी । प्रतिनिधी

बीड आगारातून लिंबादेवी फाटा-डोंगरकिन्ही-पिंपळवंडी-अंमळनेर-धामणगाव-दौलावडगाव-अहिल्यानगर मार्गे बीड ते पुणे अशी चार-पाच दिवसांपूर्वी इलेक्ट्रॉनिक शिवाई बस सुरू केली आहे.परंतु,या परिसरातील सामान्य प्रवासी जनतेला शिवाई बसने प्रवास करणे परवडणारा नसून या बसच्या तिकिटाचे दर जास्त असल्याने सामान्य प्रवाशांच्या खिशाला मोठी झळ पोहोचत असून ''शिवाई बस'' ऐवजी साध्या दरातीलच ''लालपरी'' बस सुरू करावी अशी या परिसरातील प्रवाशांकडून मागणी होत आहे.या बससाठी प्रवाशांची मर्यादा ठराविकच असून या बसमध्ये मर्यादेपेक्षा जास्त प्रवासी झाले तर ही बस अनेक ठिकाणी थांबत नाही. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय होऊन प्रवाशांना प्रवासापासून वंचित राहण्याची नामुष्की ओढावते.याच मार्गावरून आपल्याच बीड आगाराची बीड-कल्याण व पाटोदा आगाराची पाटोदा-मुंबई(कुर्ला) या साध्या दरातील ''लालपरी बस'' सुरू आहेत. बीड आगारप्रमुखांनी ''शिवाई'' बस ऐवजी ''लालपरी बस'' सुरू करून प्रवाशांसाठी बहुजन हिताय,बहुजन सुखाय ब्रीद साध्य करावे हीच अपेक्षा व्यक्त केली जात आहे.बीड आगारप्रमुखांनी या मार्गावरून सुरू केलेली ''शिवाई बस'' सेवा म्हणजे ''असून अडचण,नसून खोळंबा''अशी म्हणण्याची वेळ प्रवाशांवर आली आहे.

# विद्यार्थ्यांनो खूप शिका मोठे व्हा, शिक्षणानेच माणूस यशाचे शिखर गाठून यशस्वी होतो-महंत महादेवानंद भारती महाराज

पिंपळवंडी । प्रतिनिधी

शाळा हे विद्यामंदिर आहे.शिक्षक-शिक्षिका देवता असून त्यांचा विद्यार्थ्यांनी आदर करून शिक्षण घ्या.शिक्षणानेच माणसाला मोठेपण येते व मोठा मान सन्मान मिळून मोठे होता येते.शिक्षण हे वाघिणीचे दूध असून ते घेणारा गुरगुरणारच असा बहुमोल उपदेश गुरुवर्य महंत महादेवानंद भारती महाराज यांनी गुणवंत विद्यार्थी सत्कार व शालेय गणवेश वाटप प्रसंगी केला.

याविषयी माहिती अशी की,पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री स्वामी अमृत भारती विद्यालयात दि.१०/०८/२०२५ रविवार रोजी गुणवंत विद्यार्थी यांचा सत्कार व शालेय गणवेश वाटप,स्कूल बॅग वाटप कार्यक्रम संपन्न झाला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाप्रमुख तथा श्री क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थानचे महंत ह.भ.प.महादेवानंद भारती महाराज तसेच



प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक परमेश्वर येवले,गणेश सांगळे (उपजिल्हाधिकारी),जेष्ठ नेते भाऊसाहेब भवर,जोगदंड सर, शिवाजी ठोंबरे,जगन माळी,अभय जोगदंड,शेषराव तांबे,लोणकर साहेब, बंड सर,माने साहेब,नामदेव शिंदे, बावणे साहेब,नामदेव सानप,ॲड.एन. एन.साबळे,सरपंच निलेश मोरे, उपसरपंच दादासाहेब पवार,अशोक जेधे,महेश खेंगरे,उद्धवशेठ पवार, गोविंद गाडे,एम.डी.साबळे सर, परमेश्वर सातपुते,बाबासाहेब पन्हाळकर,अर्जुन आबा पवार, बी.पी.पवार,सांगळे सर,पत्रकार बबनराव उकांडे,भाऊसाहेब पवार आदींची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.देवी सरस्वती प्रतिमेचे पूजनानंतर मान्यवरांच्या शुभहस्ते दहावी-बारावीतील गुणवंत यशस्वी विद्यार्थी स्कॉलरशिप,एनएमएमएस, चित्रकला,क्रीडा स्पर्धेतील विद्यार्थ्यांना गौरविण्यात येऊन गणवेश व स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले.स्कूल बॅग उद्योजक परमेश्वर येवले यांच्यामार्फत होत्या.याप्रसंगी महंत महादेवानंद भारती महाराजांनी विद्यार्थ्यांना मोलाचे बहुमूल्य मार्गदर्शन करून शिक्षणाचे महत्व पटवून दिले.मुलांनी नियमित अभ्यास केला पाहिजे. मोबाईलचा उपयोग योग्य पद्धतीने करून मोबाईलमध्ये शिक्षणाचे चांगले व इंग्रजीचे ॲप असून मोबाईलचा वापर योग्य करावा असा विद्यार्थ्यांना उपदेश करून या परिसरातील गोरगरिबांची मुला-मुलींची शिक्षणाची गैरसोय होऊ नये म्हणून या ठिकाणी श्री.गंगाभारती महाराज शिक्षण प्रसारक मंडळाचे माध्यमातून शिक्षण संस्था उभारून शाळेची शिक्षणाची व्यवस्था केली.या परिसरातील ऊसतोड मजुराच्या हातातील कोयता बंद व्हावा यासाठी साठवण तलावासाठी प्रयत्न करून शेतकऱ्यांच्या शेतीचे नंदनवन केले आहे.ऊसतोड मजूर ऊस उत्पादक झाला आहे.प्रत्येकांनी पशु पक्षावर वृक्षावर व माणसावर प्रेम केले पाहिजे.झाडे ऑक्सिजन देतात पक्षांना फळे देतात.त्यासाठी प्रत्येकांनी वेगवेगळ्या प्रकारच्या झाडांची जोपासना व संवर्धन करावे असा उपदेश केला.याप्रसंगी ॲड. साबळे यांनी विद्यार्थ्यांना नवीन कायद्याची सविस्तर माहिती सांगून सर्वांनी कायद्याचे काटेकोरपणे पालन करून मोबाईलचा वापर योग्य पद्धतीने करण्याचा सल्ला दिला. उपजिल्हाधिकारी सांगळे यांनी भाषणातून विद्यार्थी-पालक,शिक्षक यांच्या जबाबदाऱ्या काय आहेत हे सांगून विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी लागणारी पुस्तके शाळेसाठी देण्याचे यावेळी म्हणाले.जगन माळी यांनी मनोगतातून मन आनंदी,शरीर निरोगी असेल तर माणूस यशस्वी होतो.मनापासून काम करण्याची जिद्द असेल तर माणूस कोणत्याही कामात यशस्वी होतो.अडचणीवर मात करून काम करा.जबरदस्त इच्छा असेल तर यश मिळतेच असे म्हटले.तसेच शेषराव तांबे,लोणकर साहेब,ठोंबरे, जोगदंड सर,बंड सर आदींनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# महालक्ष्मी कला केंद्र पॉक्सो प्रकरणातील सर्व आरोपी निर्दोष

### सबळ पुराव्याअभावी जिल्हा व सत्र न्यायालयाचा निर्णय; २७ आरोपींवरचा गुन्हा सरकार पक्षाला सिद्ध करता आला नाही

केज । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात २०२३ मध्ये गाजलेल्या महालक्ष्मी कला केंद्र, उमरी (ता. केज) येथील पोक्सो गुन्ह्यातील सर्व २७ आरोपींना सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्त करण्यात आले. जिल्हा व सत्र न्यायालय, केज येथे विशेष पोक्सो प्रकरण क्र. १७७/२०२३ सरकार विरुद्ध सत्वशीला या खटल्याचा निकाल न्यायमूर्ती एस. बी. भाजीपाले यांनी ११ ऑगस्ट २०२५ रोजी सुनावला.

७ जुलै २०२३ रोजी पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास, शासनाने निश्चित केलेल्या वेळेपेक्षा उशिरा महालक्ष्मी कला केंद्र सुरु असल्याची माहिती मिळाली. तपासात असे उघड झाले की, कला केंद्रातील व्यवस्थापक लहू रामहारी अंधारे, नृत्य करणाऱ्या महिला, ग्राहक आणि इतर काही जण मिळून उपस्थित होते. त्यावेळी कला केंद्रात चार अल्पवयीन मुलींना नृत्यासाठी बोलावून त्यांचे लैंगिक शोषण करण्यात आले, तसेच एका अल्पवयीन मुलीवर अनोळखी व्यक्तीने वारंवार शारीरिक संबंध ठेवले, असा आरोप होता. तसेच, चालक सत्वशीला बाबासाहेब आंधारे व रत्नाकर शिंदे यांनी आर्थिक फायद्यासाठी अल्पवयीन मुलींचा वेश्याव्यवसायासाठी वापर केल्याचा आरोप करण्यात आला. पीडिता दलित समाजातील असल्याने, माहीत असूनही तिच्यावर दबाव आणून आणि पैशाचे आमिष दाखवून शोषण केल्याचा गुन्हा दाखल झाला. या प्रकरणात भा.दं.वि., पोकसो कायदा, अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम, बालकांची काळजी व संरक्षण अधिनियम २०१५ आणि अ.जा.जा.अ. प्र.का. यांसह विविध कलमांखाली गुन्हा नोंदवण्यात आला. तपास पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांनी करून सर्व २७ आरोपींविरुद्ध दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान फिर्यादी पक्षाकडून एकूण आठ साक्षीदार तपासण्यात आले. मात्र, सरकार पक्षाला आरोप सिद्ध करण्यात अपयश आले. आरोपींच्या वकिलांच्या बचावामुळे न्यायालयाने सर्व आरोपींना सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्त केले. या प्रकरणातील लहू अंधारे, शीतल अंधारे, संगीता काळे आणि संतोष बडगे हे चार आरोपी निकालापर्यंत कारागृहात होते, तर उर्वरित आरोपी जामिनावर होते. आरोपींच्या बाजूने ॲड. अजित लोमटे यांनी काम पाहिले. त्यांना ॲड. संस्कार शिनगारे, ॲड. चंद्रकांत जाधव, ॲड. ओमप्रकाश धोत्रे आणि ॲड. अभिजित सोळंके यांनी सहकार्य केले. या प्रकरणाकडे संपूर्ण बीड जिल्ह्याचे लक्ष लागले होते.

# राक्षसभुवनची लढाई या ऐतिहासिक पुस्तकाचे प्रकाशन

**बीड । प्रतिनिधी**

**१० ऑगस्ट १७६३ रोजी बीड जिल्ह्यातील राक्षसभुवन या ठिकाणी मराठे व निजाम यांच्यामध्ये घनघोर लढाई झाली. या लढाईत निजाम पराभूत होऊन गोदावरी पुरातून पळून गेला होता. राक्षसभुवनच्या मातीत मराठी सेनेला मिळालेला हा प्रचंड मोठा विजय आजपर्यंत अप्रकाशित होता. पराक्रमाचा हा इतिहास बीड येथील इतिहास अभ्यासक डॉ.अशोक बांगर यांच्या संशोधन लिखाणातून राक्षसभुवनची लढाई या पुस्तक रूपाने प्रसिद्ध झाला.**

श्रीक्षेत्र राक्षसभुवन येथील शनी मंदिर परिसरातील सभागृहामध्ये राक्षसभुवनची लढाई या पुस्तकाचे प्रकाशन व ३६२ वा हिंदवी विजय दिवस ग्रामस्थ व इतिहास प्रेमींच्या वतीने साजरा करण्यात आला.पुस्तकाचे लेखक बीड येथील इतिहास अभ्यासक डॉ.अशोक बांगर असून प्रकाशक श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ पुणे हे आहेत. सदरील पुस्तकामध्ये राक्षसभुवन लढाई पूर्वीची पार्श्वभूमी, लढाईचे कारणे, पेशवे माधवराव व निजाम यांनी खेळलेल्या चाली, प्रत्यक्ष राक्षसभुवन लढाई व तह या विविध घटनेचा तपशीलवार व संदर्भसह उल्लेख केलेला आहे. राक्षसभुवन व परिसरातील इतिहास प्रेमी ,समस्त हिंदू आघाडीच्या वतीने राक्षसभुवन लढाई विजयी दिनाचे अवचित्य साधून विविध कार्यक्रमाचे आयोजन केले होते.पुस्तक प्रकाशनसह शनिदेव महाराज यांना अभिषेक घालण्यात आला. विविध शस्त्रांचे पूजन , भगव्या ध्वजाचे पूजन, ऐतिहासिक पोवाडा व व्याख्यानाचे आयोजन केले होते. यावेळी विविध क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक मान्यवरांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. पुणे येथील ज्येष्ठ



व्याख्याते मोहनजी शेटे यांनी राक्षसभुवन लढाईच्या इतिहासावर आपल्या व्याख्यानातून प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक दत्तात्रय पत्की तर आभार श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाचे कार्यवाह सुधीरजी थोरात यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाला स्वामी अंगद महाराज, मिलिंद भाऊ एकबोटे, समीर कुलकर्णी, समाजसेवक माणिक देशमुख,शिवशंभू विचारमंचचे सुधीरजी थोरात, इतिहास अभ्यासक मोहन शेटे व स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमाला बहुसंख्य इतिहास प्रेमींनी व नागरिकांनी उपस्थिती दर्शवली.

पान ६ वरुन...

## दखल न घेतल्याचा निषेध

अधिकारी अभियंता भोपळे साहेब सह इतर संबंधितांना व्हाट्सअप वर फोटो, व्हिडिओ पाठवले. भ्रमणध्वनीवर संपर्क साधला परंतु ते अधिकारी म्हणतात की मी यांना सांगितले, मी त्यांना सांगितले, होईल तुमचे काम असे कारण देत टाळाटाळ करीत आहेत. एक पत्रकार,सामाजिक कार्यकर्ता असूनही जर हे अधिकारी आमची दखल घेत नसतील तर सामान्य नागरिकांशी हे कसे वागत असतील ? कडा गावातील याच रस्त्यावर चिखल - पाण्याचे ढव मोठ्या पुलावर हि आहे आणि इतर ठिकाणी हि आहेत. सध्या कडिनदी वाहत असल्याने बस स्थानक,महेश मंदिर,हजरत मौलाली बाबा दर्गासह इतर देवस्थानात जाताना या रस्त्यावरून कसरत करत व वाहनांमुळे चिखल-पाणी अंगावर येणार नाही याची काळजी करत चालावे लागत आहे. तरी आपणांस कळकळीची विनंती आहे कि आपण नागरीकांना या होणाऱ्या त्रासातून मुक्त करावे तसेच यामुळे भविष्यात होणाऱ्या अपघातांना आळा घालण्यासाठी यावर लवकरात लवकर उपाययोजना करावी अशी विनंती केली आहे. तसेच यावेळी ही दखल घेतली गेली नाही तर लवकरच आंदोलन करण्यात येईल याची आपण नोंद घ्यावी या मागणीचे निवेदन देण्यात आले आहे.

## स्व.बाबूरावजी आडसकर

नागरिक, नेते यांनी आडसकर कुटुंबाचे कौतुक केले आहे. याप्रसंगी मृदांगाचार्य उद्धव बापू आपेगावकर, रामभाऊ कुलकर्णी प्रदेश प्रवक्ता भाजपा यांनी आपले मनोगत व्यक्त करताना स्व. बाबूरावजी आडसकर साहेब यांनी राजकारणा बरोबरच सांप्रदायिक व शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या कार्याचे स्वरूप मांडले. मा. रमेशराव आडसकर, ऋषी भैय्या आडसकर,अर्चना ताई आडसकर,रंजित दादा आडसकर व संपूर्ण आडसकर कुटुंब हे तात्यांचा वारसा पुढे घेऊन जात आहेत, त्याचेही कौतुक केले आहे. सहकार, शैक्षणिक क्षेत्रात स्व. बाबूरावजी आडसकर (तात्या) यांनी सामान्य नागरिकांशी नाळ कायम जोडण्यासाठी त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी अहोरात्र काम केले, तोच वसा घेऊन आडसकर कुटुंब बीड जिल्ह्यात काम करेल असा विश्वास मा. रमेशराव आडसकर यांनी व्यक्त केला. लोकनेते, स्व. बाबूरावजी आडसकर (तात्या) यांच्या नवव्या पुण्यतिथी निमित्ताने रामभाऊ कुलकर्णी (प्रदेश प्रवक्ता भाजपा) श्री. उद्धव बापू आपेगावकर, दत्ता अबा पाटील, व्हा. चे. अंबासाखर, अंकुशराव इंगळे सभापती कृ. उ. बा.स, माजी जि. प. सदस्य सुरेश तात्या पाटील, मनोहरराव डाके आबा , राजेश्वर आबा चव्हाण जि. अ. रा. कॉ. पा. बीड, राजाभाऊ औताडे दिलीपराव गुळभिले,नेटके साहेब, बबन भैय्या लोमटे, उदयसिंह दिख्खत, किर्दक साहेब, राज किशोर पापा मोदी, गटनेते हारून भाई इनामदार, सौ. सिताताई बनसोड नगराध्यक्ष केज, ईश्वर मुंडे,माजी जि. प. सदस्य किसन दादा कदम, बंडूसेठ भनसाळी, उत्तमराव थोरात, शिवाजीराव देशमुख, गफार साहेब, अमर भैय्या पाटील, सुशील भैय्या अंधारे,अझहर भैय्या इनामदार, हनुमंत काका मोरे, अनंतदादा लोमटे, कमलाकर कोपले, मोरे साहेब सरपंच मोरेवाडी, विनायक मुळे शिवसेना वडवणी, सर्व रोग निदान व रक्तदान शिबीरा निमित्त स्वा. रा. ती. अंबाजोगाई येथील डॉ. रूचा पाटील, डॉ. सचिन काटाळे, डॉ. निशांत, डॉ मोहम्मद तारीक, डॉ. सचिन ढवारे, डॉ. अनिकेत मुसळे, डॉ. साहील मुंडे, डॉ. मंदार दाभाडे, डॉ. प्रियंका घुले, डॉ. अतुल डोईफोडे, डॉ. नेहा सोनवणे, डॉ. कार्तिक कोलापरथी, डॉ. अजिंक्य राठोड, डॉ. अनंत पवार हे वैद्यकीय पथक उपस्थित होते. यावेळी सुत्रसंचालन सुरेश शिनगारे सर यांनी केले.

## नदीतून वाळू चोरी करणारा

नंबर वाल्यांना दणका दिला आहे, एक पाठोपाठ धडक चार कारवाया करत अवैध वाळू वाहतूक करणारे वाहने पकडून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले असल्याने तालुक्यात या कारवाईचे कौतुक होत आहे. पदभार घेतच धडक कारवाईला सुरुवात करून राजेश गडवे यांनी आपल्या कार्याची तत्परता दाखवून दिली. दिनांक १० रोजी उपविभागीय पेट्रोलिंग दरम्यान गायकवाड जळगाव या गावात अवैध वाळू वाहतूक करणारा ट्रॅक्टर दिसताच पोलिसांनी जळगाव येथील सरकारी दवाखान्याजवळ टॅक्टर पकडला यावेळी सपोनि गडवे आणि त्यांचे सहकारी व गावातील दोन पंच यांच्या समक्ष स्पॉट पंचनामा करत ट्रॅक्टर जप्त केले. ही कार्यवाही केल्याने वाळू माफियांना चांगलाच दणका बसला असून एपीआय राजेश गडवे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेल्या कारवाईचे कौतुक चकलांबा ग्रामस्थांकडून होत आहे.

## बदल्या प्रक्रियेत चुक विन्सिस

ग्रामविकास मंत्री यांचेकडे केलेली असून त्यांची प्रत विन्सोस कंपनीलाही पाठविण्यात आलेली आहे, संवर्ग चार मधील शिक्षकांना न्याय न मिळाल्यास संघटना विन्सीस कंपनी विरुद्ध तसेच शासनाविरुद्ध न्यायालयात जाणार असल्याचे अनिल जाधवर यांनी शासनास कळविले आहे.

# फेन्सिंग राज्यस्तरीय स्पर्धा हिंगोली येथे घेतल्यामुळे खेळाडूंना प्रोत्साहन मिळेल - आ. हेमंत पाटील

**हिंगोली । प्रतिनिधी**

हिंगोली: राज्यस्तरीय फेन्सिंग स्पर्धेचे भव्य आयोजन करून हिंगोलीचा नावलौकिक संपूर्ण राज्यात झाला आहे. स्पर्धेच्या आयोजनामुळे खेळाडूंना प्रोत्साहन मिळेल, यामुळे सातत्यपूर्ण आयोजन महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन स्वागताध्यक्ष आ. हेमंत पाटील यांनी केले.

हिंगोली येथील लिंबाळा मक्ता परिसरात असलेल्या जिल्हा क्रीडा संकुलामध्ये २७ वी राज्यस्तरीय सब-ज्युनियर फेन्सिंग स्पर्धा सुरू झाली असून शनिवार दि. ९ ऑगस्ट रोजी दुसऱ्या दिवशी छत्रपती संभाजीनगर,,पुणे, रायगड भंडारा या जिल्ह्यातील स्पर्धकांनी आपले वर्चस्व निर्माण केले. या विजेत्या खेळाडूना वसमत येथील मा. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा संशोधन केंद्राचे अध्यक्ष कॅबिनेट दर्जा प्राप्त मंत्री ना आ. हेमंतभाऊ पाटील यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले. यावेळी वनविभाचे प्रमुख डॉ. राजेंद्र नाळे, मा. नगरसेवक बाळासाहेब देशमुख, राज्य फेन्सिंग असोसिएशनचे सचिव प्रा.



डॉ. राजेंद्र नाळे, जिल्हा फेन्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष कल्याण देशमुख आदीसह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी ना. आ. हेमंत पाटील यांनी हिंगोली सारख्या ठिकाणी आयोजक कल्याणराव देशमुख यांनी स्पर्धा आयोजन करून एक प्रकारे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना या खेळाचे गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी दालन सुरू केले. यामुळे नक्कीच या भागातील खेळाडूंना स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी मदत होईल. दुसऱ्या दिवशी दिवशी राज्यातून आलेल्या अनेक संघांनी भाग घेतला यामध्ये छत्रपती संभाजीनगर, लातूर, पुणे,नाशिक या जिल्ह्यातील खेळाडूंनी आपले वर्चस्व गाजविले. दुसऱ्या दिवशी स्पर्धेमध्ये यशस्वी ठरलेले खेळाडू पुढील प्रमाणे आहेत.

वैयक्तिक निकालामध्ये ईपी प्रकार मध्ये मुलामध्ये प्रथम विराज केंद्रे नाशिक , द्वितीय बसवराज महेश छत्रपती संभाजी नगर, तृतीय समर्थ डोंगरे छत्रपती संभाजी नगर, तृतीय शौर्य यादव नाशिक तर सांघिक निकाल ईपी प्रकार प्रथम नाशिक जिल्हा विराज केंद्रे शौर्य यादव प्रणव डेरले अजय पाडवी, द्वितीय पुणे जिल्हा कविष उतेकर, मंथन तपकीर, सक्षम जाधव ,राजवीर चोखटे, तृतीय छत्रपती संभाजी नगर समर्थ डोंगरे,शिवम पंडित, श्याम पंडित,तृतीय भंडारा पुष्कर वाघाये, निरव किर्पण, अवि खादव , उमर मन्सुरी. तर मुलीमध्ये तसेच वैयक्तिक निकालामध्ये प्रथम जिजाऊ पाटील पुणे, शौर्या इंगवले पुणे, उमा डोंगरे, स्वामिनी डोंगरे तर सांघिक मध्ये प्रथम आर्या पाटील, स्वामिनी डोंगरे, उमा डोंगरे वैष्णवी कावळे,द्वितीय नाशिक अनया सुळे, मृगा शुचे, लब्धी मोदी, आराध्या कुंभार, तृतीय रायगड अनन्या गाडगे,, समरा पेवेकर, रेवा दातार तृतीय पुणे शरण्य पाटील, जिजाऊ पाटील, शौर्या इंगवले, साईश्री आग्रे खेळाडूंनी या स्पर्धेत दुसऱ्या दिवशी वर्चस्व सिद्ध केले यामध्ये पंच म्हणून स्पर्धा प्रमुख आनंद वाघमारे मुंबई केदार ढवळे, तुषार आहेर ,अभिषेक दुधाने, सौरभ तोमर,राहुल माडवरकर,प्रफुल जगताप, धीरज माने यांनी काम बघितले आहे. अशी माहिती प्रसिद्धीप्रमुख गोपालराव सरनायक यांनी दिली आहे.

## विनायकराव मेटे यांच्या पुण्यतिथी निमित्त सर्जिकल गाऊनचे वाटप

बीड । प्रतिनिधी

लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांचे दि.१४ ऑगस्ट रोजी पुण्यस्मरण आहे. त्यानिमित्त शिवसंग्राम विद्यार्थी आघाडीने सामाजिक उपक्रम राबविण्याचे ठरवले आहे. यावेळी बीड येथील शासकीय रुग्णालयात डॉक्टर आणि रुग्णांना सर्जिकल गाऊनचे वाटप करण्यात आले आहे. या प्रसंगी शिवसंग्राम विद्यार्थी आघाडीचे कार्याध्यक्ष मनीष सुहास पाटील, अमोल नवले, अनिकेत साळवे, उत्कर्ष कुलकर्णी, विक्की गिरी आदी उपस्थित होते.



लोकनेते विनायक मेटे यांची पुण्यतिथी विविध समाज उपयोगी उपक्रमांनी साजरा व्हावी. त्यांच्या विचारांचा वसा आणि वारसा पुढे घेऊन जात डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांच्या सूचनेनुसार पुण्यतिथी निमित्त मेटे साहेबांना अभिप्रेत सामाजिक उपक्रम राबत त्यांच्या स्मृतिदिनी सामाजिक उपक्रम राबवत त्यांना अनोख्या पद्धतीने श्रद्धांजली अर्पण करण्याचा मानस शिवसंग्राम विद्यार्थी आघाडीने घेतला याचाच भाग म्हणून शासकीय रुग्णालयात डॉक्टर आणि रुग्णांना सर्जिकल गाऊनचे वाटप करण्यात आले आहे.

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com"
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-२१७ दिनांक-०७/०८/२०२५

### जाहिर प्रगटन

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती स्वप्नील हिरामण सोनवणे रा. टाका ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वत: जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म/मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| १ | स्वप्नील हिरामण सोनवणे | स्वत: | ०४/०५/१९८६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक-७-८-२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com"
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-१६० दिनांक-३०/०७/२०२५

### जाहिर प्रगटन

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती चाँद महेमुद शेख रा. भार्डी ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगा जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | आली चाँद शेख | मुलगा | २९/१०/२०१८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ३०/०७/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com"
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-२५१ दिनांक-१२/०८/२०२५

### जाहिर प्रगटन

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती दत्ता रामनाथ गोसावी रा. भार्डी ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगी जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | आनंदी दत्ता गोसावी | मुलगी | २३/११/२०२० |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १२/०८/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**




राज्य लोकतंत्र

# शेत-शिवार

बुधवार दि.१३ ऑगस्ट २०२५




# शेतीला कधी आणि किती पाणी द्यायचं? आता स्मार्ट डिव्हाइस सांगणार संपूर्ण माहिती

शेतीतील सर्वात मोठे आव्हान म्हणजे योग्य वेळी आणि योग्य प्रमाणात सिंचन करणे. जर पाणी वेळेवर उपलब्ध झाले नाही तर पीक खराब होऊ शकते आणि आवश्यकतेपेक्षा जास्त पाणी दिल्यानेही नुकसान होते. पण आता शेतकऱ्यांची ही समस्या सुटणार आहे.  च्या विद्यार्थ्यांनी एक स्मार्ट उपकरण विकसित केले आहे जे जमिनीतील ओलावा पातळी रिअल टाइममध्ये मोजेल आणि शेताला कधी आणि किती पाणी हवे आहे हे सांगितले जाते.

३० टक्क्यांपर्यंत पाणी वाचणार : या उपकरणाची खास गोष्ट म्हणजे याद्वारे शेतकऱ्यांना सिंचनाची योग्य वेळच कळणार नाही तर पाणी वाचवता येईल. प्रकल्प मार्गदर्शक आणि महाविद्यालयीन प्राध्यापकांनी दिलेल्या माहितीनुसार, सुरुवातीच्या चाचण्यांमध्ये हे उपकरण वापरल्याने सिंचनामध्ये ३० टक्के  पर्यंत पाणी वाचू शकते हे समोर आले आहे. आजच्या काळात जेव्हा पाण्याचे संकट वाढत आहे, तेव्हा हे उपकरण शेतकऱ्यांसाठी वरदान ठरू शकते.

रिअल टाईम डेटासह काम

डिव्हाइस टीममध्ये सहभागी विद्यार्थ्यांनी सांगितले की त्यांनी ही प्रणाली विशेषतः भारतीय कृषी प्रणाली लक्षात घेऊन डिझाइन केली आहे. यामध्ये, मातीमध्ये बसवलेले सेन्सर सतत



ओलाव्याचे प्रमाण मोजतात आणि ही माहिती संगणक किंवा मोबाइल ॲपवर पाठवतात. मातीची ओलावा कमी होताच, डिव्हाइस एक अलर्ट पाठवते आणि सांगते की आता सिंचन आवश्यक आहे. इतकेच नाही तर किती काळ आणि किती पाणी द्यावे हे देखील सांगितले जाते.

तंत्रज्ञानासह शेतीला एक नवीन दिशा मिळेल : विद्यार्थ्यांचा हा प्रयत्न तंत्रज्ञानाला थेट शेतीशी जोडण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. हे उपकरण बनवण्यासाठी आयओटी (इंटरनेट ऑफ थिंग्ज) तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये, मायक्रोकंट्रोलर, सेन्सर, वाय-फाय मॉड्यूल आणि कोडिंगच्या मदतीने, एक प्रणाली तयार करण्यात आली आहे जी पूर्णपणे स्वयंचलितपणे कार्य करते.

हे टीमचे वैशिष्ट्य आहे : हा प्रकल्प बी.टेक (इलेक्ट्रॉनिक्स आणि कम्युनिकेशन) च्या विद्यार्थिनी प्रेरणा, नंदिनी आणि शिवांगी यांनी एकत्रितपणे बनवला आहे. त्यांच्या मार्गदर्शक डॉ. सुभिता शर्मा यांनी केवळ तांत्रिक मार्गदर्शन केले नाही तर त्यांना समाजासाठी उपयुक्त काहीतरी करण्यासाठी प्रेरित केले.

शेतकऱ्यांसाठी उपयुक्त

या उपकरणाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे लहान आणि मध्यम शेतकरी देखील ते सहजपणे वापरू शकतात. त्याची किंमत खूप कमी आहे आणि ते स्मार्टफोनशी जोडले जाऊ शकते. याचा अर्थ तंत्रज्ञानाची फारशी माहिती नसलेले शेतकरी देखील कोणत्याही अडचणीशिवाय ते वापरू शकतील.

सरकार आणि कृषी संस्थांचे सहकार्य आवश्यक आहे : जर सरकार आणि कृषी विभागाने मोठ्या प्रमाणात या तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यास मदत केली तर देशातील कोट्यवधी शेतकऱ्यांना फायदा होऊ शकतो, असे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. यामुळे केवळ पीक उत्पादन वाढणार नाही तर पाण्याची बचत होईल आणि खर्चही कमी होईल.

# सोयाबीन नुकसान पातळी वाढली



खानदेशात कापसासह आता सोयाबीनचेही अतिपावसाने नुकसान होत आहे. शासनाच्या पीकविमा योजनेत सहभागी शेतकरी पीकविमा योजनेतून भरपाईसाठी पोर्टलवर तक्रारी नोंदवीत आहेत.

अतिपावसात कापसाची वाताहत होत आहे. सोयाबीन पिकाची वाढही खुंटली आहे. यामुळे शेतकरी चिंतेत आहेत. काळ्या कसदार जमिनींत पीक जोमात होते. परंतु सध्या पिकाची स्थिती बिकट आहे. पाऊस मागील ३० ते ३५ दिवसांपासून सतत सुरू आहे. यामुळे पिकात कुठलीही फवारणी घेता आली नाही. तसेच तणही वाढले. सखल भागात पाणी कायम राहिल्याने पीक पिवळे, लाल पडले असून, त्याचे १०० टक्के नुकसान आजघडीला अनेक भागात झाले आहे. शासनाकडून नुकसानीचे पंचनामे सुरू करण्यात आले आहेत. यात पीकविमा योजनेत सहभागी झालेले शेतकरी नुकसान भरपाईसाठी विमा योजनेच्या पोर्टलवर तक्रारी नोंदवीत आहेत. खानदेशात तीन विविध कंपन्या खरीप पीकविमा योजनेसंबंधी कामकाज करीत आहेत. विमा कंपनीकडे तक्रार नोंदविल्यानंतर संबंधितांकडून पंचनामा केला जाईल. यानंतर नुकसान पातळी किती आहे, हे विमा कंपनी निश्चित करील. सध्या महसुली कर्मचारी महसूल सप्ताह व अन्य कार्यक्रमांत व्यस्त आहेत. तर कृषी सहायकांची संख्या कमी आहे. यामुळे विमा कंपनीचे प्रतिनिधी पंचनामे करताना शासकीय यंत्रणेशिवाय दाखल होत आहेत. दुसरीकडे अनेक तालुक्यांत घरगोठ्यांची हानीही झाली आहे. तसेच शिवारातही नुकसान दिसत आहे. यामुळे शेतकरी यासंबंधी पंचनामे करून घेत आहेत. याच वेळी विमा कंपनीचेही पंचनामे सुरू झाल्याने यंत्रणांचाही गोंधळ होत आहे. परंतु पंचनाम्यांना उशीर व्हायला नको यासाठी विमा कंपन्या आपल्या यंत्रणेच्या मदतीने योग्य ती माहिती संकलित करून पुढील कार्यवाही वरिष्ठांच्या सूचनेनुसार करीत आहेत. खानदेशात यंदा सोयाबीनची पेरणी सुमारे ४० हजार हेक्टरवर झाली आहे. जळगाव जिल्ह्यातील क्षेत्र ३१ हजार हेक्टरपर्यंत आहे.

कापसासह आता सोयाबीन नुकसानीच्या तक्रारी विमा कंपनीकडे दाखल होत असल्याने कंपनीचीही दमछाक पुढे होईल, अशी स्थिती आहे. सुमारे १५०० तक्रारी सोयाबीन नुकसानीसंबंधी दाखल झाल्या आहेत. या तक्रारी तातडीने निकाली काढून शेतकऱ्यांना परतावे दिले जावेत, अशी मागणीही केली जात आहे. मागील वर्षी कोरड्या दुष्काळाने पिकाची हानी झाली. यंदा ओला दुष्काळ आहे. यामुळे शासनाने सरसकट भरपाईसाठी कार्यवाही करावी, पंचनामे करून घ्यावेत, विमा कंपनीलाही सरसकट पंचनामे करण्यासंबंधी ताकीद दिली जावी, अशी मागणीही केली जात आहे.

# गाजर गवत निर्मुलनासाठी मेक्सिकन भुंग्याचा वापर!

खरीप हंगामात किडी आणि रोगाप्रमाणेच तणांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होतो. विशेषतः गाजर गवताचा प्रसार मोठ्या प्रमाणात होतो. यामुळे पिकांचे तर नुकसान होतेच शिवाय हे गवत जनावरांच्या खाण्यात आल्यास त्यांना सुद्धा वेगवेगळे आजार होतात किंवा विषबाधा होऊ शकते.  गाजर गवताचे शास्त्रीय नाव पार्थेनियम हिस्टिरोफोअर्स असे आहे. याला काँग्रेस गवत, पांढरफुली, चटकचांदणी अशा नावांनी सुद्धा ओळखले जाते. गाजर गवत नियंत्रणाचे वेगवेगळ्या पद्धती आहेत, यात मेक्सिकन भुंग्यांचा वापर सुद्धा केला जातो.

मेक्सिकन भुंगेमार्फत गाजर गवत निर्मूलन : मेक्सिकन भुंगे ज्यांना झायगोग्रामा बायकोलरॅटा या नावाने सुद्धा ओळखतात. या किडीचे प्रौढ भुंगे मळकट पांढरे असून त्यावर काळसर रंगाच्या सरळ आणि नागमोडी रेषा असतात. मादी भुंगे अलग अलग अथवा गुच्छात पानाच्या खालील बाजूवर अंडी घालतात. अंड्यातून बाहेर निघालेल्या अळया गाजर गवताच्या वरील भागातील पाने खातात. अळीच्या ४ अवस्था असून पूर्ण वाढलेल्या अळया रंगाने पिवळ्या असतात. अळी अवस्था १० ते ११ दिवसांची असते, कोषावस्था ९  १० दिवसांनी असते. कोषावस्थेत मातीत गेलेले भुंगे जमिनीतून निघून गाजर गवताच्या पानावर उपजीविका करतात. तरुण अळया झाडाची वाढ व फुले येण्याचे थांबवितात. पावसाळ्यात जून ते ऑक्टोबर पर्यंत हे भुंगे गाजर गवत फस्त करतात. नोव्हेंबर नंतर हे भुंगे जमिनीत ७ ते ८ महिने दडून बसतात आणि पुढील वर्षी सुरुवातीच्या पावसानंतर जमिनीतून निघून गाजर गवताचा नाश करण्यास सुरुवात करतात. हे भुंगे एखाद्या ठिकाणी स्थिर झाले की पुढच्या वर्षी पुन्हा पुन्हा भुंगे सोडण्याची गरज पडत नाही.

भुंगे कोठे व किती सोडावेत : शेतात प्रति हेक्टरी ५०० भुंगे सोडावेत. मनुष्यप्राण्याचा अडथळा / शिरकाव नाही, अशा जागी भुंगे सोडणे योग्य असते. प्रभावी नियंत्रणासाठी रेल्वे व राज्य रस्त्याच्या दोन्ही बाजूने पडीक जमिनीत, बसस्थानकाजवळीत मोकळ्या जागेत सोडावे. भुंगे दिवसा कार्यरत असल्यामुळे जमा करणे योग्य नाही. सकाळी अथवा सायंकाळी भुंगे जमा करण्यास योग्य काळ आहे. यावेळी मेक्सिकन भुंगे गोळा करून इच्छित स्थळी किंवा शेतात सोडावे. प्रयोगशाळेत प्लास्टिकच्या ६  ९ इंच आकाराच्या डब्यात. शेतात १०  १० फुट अथवा १०  १५ फुट आकाराच्या मच्छरदाणीत कृत्रिमरित्या गाजर गवतावर भुंग्याने गुणन करतात. नव्या जागी भुंगे सोडण्यासाठी कसे पाठवावे : भरपूर भुंगे असलेल्या गवतावरील ५०० १००० भुंगे १०  १५ सें.मी. उंच प्लास्टिकच्या बाटलीत टोपणास जाळी असलेले झाकण लावावे.

बाटलीत गाजर गवताचा पाला खाद्य म्हणून टाकावा.भुंग्याचा इतर पिकांना व मानवाला उपद्रव होतो का? : जैविक कीड नियंत्रण संचालनालय बंगलोरच्या चाचणी नुसार हे मेक्सिकन भुंगे इतर पिकांना व मनुष्यप्राण्याला सुरक्षित आहेत. भुंगे व अळया फक्त गाजर गवतच खातात. गाजरगवत उपलब्ध नसल्यास भुंगे जमिनीत सुप्तावस्थेत जातात. रासायनिक तणनाशकांऐवजी मेक्सिकन भुंग्यांचा वापर हा आर्थिक आणि पर्यावरणाच्या दृष्टीने खूप फायद्याचा आहे. तसेच गाजरगवत हे विषारी असल्याने ते उपटण्यासाठी मजूर वर्ग सहज तयार होत नाही. त्यामुळे जैविक नियंत्रण अत्यंत महत्त्वाचे ठरते.







### महत्वाच्या घटना

१६४२ : क्रिस्टियन हायगेन्स या शास्त्रज्ञाने मंगळाच्या दक्षिण ध्रुवावरील बर्फाच्या टोप्यांचा शोध लावला.

१८९८ : कार्ल गुस्ताव्ह विट याने ४३३ या पृथ्वीजवळच्या पहिल्या लघुग्रहाचा शोध लावला.

१९१८ : बायरिसचे मोटेर्न वेर्के एजी (बी.एम.डब्ल्यू.) ही सार्वजनिक कंपनी म्हणून स्थापन झाली.

१९५४ : रेडिओ पाकिस्तान वरुन 'कौमी तराना' हे पाकिस्तानचे राष्ट्रगीत प्रथमच प्रक्षेपित करण्यात आले.

१९६१ : आपल्या नागरिकांचे पश्चिम जर्मनीत होणारे स्थलांतर रोखण्यासाठी पूर्व जर्मनीने आपल्या सीमा बंद केल्या. बर्लिनची भिंत बांधण्यास सुरूवात झाली.

१९९१ : कन्नड साहित्यिक प्रा. विनायक कृष्ण गोकाक यांना ज्ञानपीठ पुरस्कार जाहीर

२००४ : ग्रीसमधील अथेन्स येथे २८ व्या ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात झाली. सुमारे ३०० दूरचित्रवाणी वाहिन्यांवरुन अंदाजे ४ अब्ज लोकांनी हा उद्घाटन सोहळा पाहिला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८८८ : जॉन लोगे बेअर्ड  स्कॉटिश अभियंता आणि दूरचित्रवाणी चे संशोधक (मृत्यू: १४ जून १९४६)

१८९० : त्र्यंबक बापूजी ठोंबरे तथा 'बालकवी'  १९०७ साली जळगाव येथे भरलेल्या पहिल्या कविसंमेलनात वयाच्या १७ व्या वर्षी त्यांनी केलेल्या कविताावाचनाने प्रभावित होऊन संमेलनाचे अध्यक्ष कान्होबा रणछोडदास कीर्तिकर यांनी त्यांना 'बालकवी' ही उपाधी देऊन त्यांचा गौरव केला. (मृत्यू: ५ मे १९१८)

१८९८ : प्रल्हाद केशव तथा आचार्य अत्रे  लेखक, कवी, शिक्षणतज्ञ, संपादक, राजकीय नेते, चित्रपट निर्माते, दिग्दर्शक, पटकथालेखक आणि वक्ते (मृत्यू: १३ जून १९६९)

१८९९ : सर अल्फ्रेड हिचकॉक  चित्रपट दिग्दर्शक (मृत्यू: २९ एप्रिल १९८०)

१९०६ : विनायक चिंतामण तथा विश्राम बेडेकर  लेखक व दिग्दर्शक (मृत्यू: ३० आक्टोबर १९९८)

१९२६ : फिडेल कॅस्ट्रो  क्यूबाचे १५ वे राष्ट्राध्यक्ष

१९३६ : वैजयंतीमाला बाली ऊर्फ 'वैजयंतीमाला'  चित्रपट अभिनेत्री

१९४५ : भारतीय-इंग्लिश क्रिकेटर रॉबिन जॅकमन यांचा जन्म.

१९८३ : संदीपन चंदा  भारताचा ९ वा ग्रँडमास्टर

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७९५ : महाराणी अहिल्याबाई होळकर  देशातील अनेक महत्त्वाच्या तीर्थक्षेत्रातील देवळांचा त्यांनी जीर्णोद्धार केला. (जन्म: ३१ मे १७२५)

१८२६ : स्टेथोस्कोप चे शोधक रेने लायेनेस्क यांचे निधन. (जन्म: १७ फेब्रुवारी १७८१)

१९१० : आधुनिक शुश्रूषा शास्त्राचा (नर्सिंग) पाया घालणार्या ब्रिटिश परिचारिका फ्लॉरेन्स नायटिंगेल यांचा जन्म. १९०७ मधे त्यांना 'ऑर्डर ऑफ मेरिट' हा किताब बहाल करण्यात आला. 'नोटस ऑफ नर्सिंग' हा त्यांचा ग्रंथ नावाजलेला आहे. (जन्म: १२ मे १८२०)

१९१७ : एडवर्ड बकनर  आंबवण्याच्या प्रक्रियेसंबंधी केलेल्या संशोधनाबद्दल नोबेल पारितोषिक (१९०७) मिळवणारे जर्मन रसायनशास्त्रज्ञ (जन्म: २० मे १८६०)

१९३६ : मॅडम भिकाजी रुस्तुम कामा  या भारतीय क्रांतिकारक महिला व परदेशातील भारतीय क्रांतिकारकांच्या आधारस्तंभ होत्या. १९०७ मधे जर्मनीत भरलेल्या आंतरराष्ट्रीय समाजवादी परिषदेत ब्रिटिशांच्या विरोधाला न जुमानता त्यांनी भारतीय स्वातंत्र्यासंबंधी प्रस्ताव मांडला. त्याच वेळी भारतीय स्वातंत्र्याचे प्रतीक म्हणून 'वंदे मातरम' हा मंत्र असलेला तिरंगी ध्वज त्यांनी फडकावला. (जन्म: २४ सप्टेंबर १८६१)

१९४६ : एच. जी. वेल्स  विज्ञानकथांसाठी प्रसिद्ध असलेले इंग्लिश लेखक (जन्म: २१ सप्टेंबर १८६६)

१९८० : पुरुषोत्तम भास्कर तथा पु. भा. भावे  अष्टपैलू आणि प्रतिभासंपन्न साहित्यिक (जन्म: १२ एप्रिल १९१०)

१९८५ : जे. विलार्ड मेरिऑट  मेरिऑट कॉर्पोरेशनचे संस्थापक (जन्म: १७ सप्टेंबर १९००)

१९८८ : गजानन जागीरदार  चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व अभिनेते, फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्युट ऑफ इंडिया'चे पहिले संचालक

२००० : नाझिया हसन  पाकिस्तानी पॉप गायिका (जन्म: ३ एप्रिल १९६५)

२०१५ : हिरो सायकल चे सहसंस्थापक ओम प्रकाश मंजाल यांचे निधन. (जन्म: २६ ऑगस्ट १९२८)

२०१६ : भारतीय हिंदू नेते प्रमुख स्वामी महाराज यांचे निधन. (जन्म: ७ डिसेंबर १९२१)

# दूध उत्पादन वाढीसाठी दर्जेदार पशुआहार

जनावरांना दिला जाणारा आहार दुधाच्या गुणवत्तेवर परिणाम करत असतो. जनावरांच्या गरजेनुसार आहाराचे योग्य नियोजन केल्यास दुधाची प्रत सुधारण्यास मदत होते. जनावरांच्या आहारातील चारा आणि पशुखाद्यच्या प्रमाणावर दुधाची प्रत अवलंबून असते. चारा कुट्टीचा योग्य आकार महत्त्वाचा आहे. जो दुधाची प्रत ठरण्यास कारणीभूत असतो आहारामध्ये स्टार्सचे प्रमाण हा महत्त्वाचा घटक आहे त्यामुळे दुधाची प्रत ठरवता येते. आहारमधून मधून दिल्या जाणाऱ्या पदार्थावर दुधाची प्रत अवलंबून असते. पशु आहारातील स्निग्धांश आणि प्रथिने यांची मात्रा दुधाची प्रत वाढवण्यास मदत करते.

चारा आणि पशुखाद्य चे प्रमाण (४० : ६०) कमीत कमी असणे हे दुधाचा स्निग्धांश वाढवण्यास गरजेचे असते. हे प्रमाण ठेवल्यामुळे ओटीपोटातील आम्लता कमी होते प्रोपियनिक आम्लं निर्मिती वाढते जे दुधाचा स्निग्धांश वाढवायला मदत करते.


धान्य युक्त आहार : योग्य पशुखाद्य घालताना चारा आणि पशुखाद्यचे प्रमाण आणि तंतुमय पदार्थ विरहीत कार्बोदकाचे प्रमाण महत्त्वाचं ठरतं. तंतुमय पदार्थ विरहित कार्बोदके यांचे प्रमाण एकूण शुष्क पदार्थाच्या आहारावर ३६ ते ३८ टक्के असावे. योग्य प्रमाणात तंतुमय पदार्थ विरहित कार्बोदके खाऊ घातल्यास दुधाचा स्निग्धांश आणि प्रथिने वाढण्यास मदत होते. परंतु अति प्रमाणात खाऊ घातल्यास दुधाचा स्निग्धांश एक युनिट कमी होतो परंतु प्रथिने ०.२ ते ०.३ युनिटने वाढतात.

धान्य प्रक्रिया : धान्याचे प्रकार आणि त्यावर करावयाची प्रक्रिया याचा महत्त्वाचा परिणाम आहारामधील स्टार्च, पचनीयता, दूध वाढ तसेच दुधाची प्रत वाढवण्यास मदत होते दळलेले, रोल केलेले, गरम केलेले, स्टीम फ्लेवर्ड, वाफवलेले किंवा गोळी पेंड स्वरूपात धान्य खाऊ घातल्यास त्यामधून स्टार्सची पचनियता आणि प्रोपियनिक आमल निर्मिती वाढते. जे दुधाचा स्निग्धांश वाढवायला मदत करतात.

स्टीम फ्लेक्स मका किंवा ज्वारी तुलनेनं वाफवलेला मका किंवा ज्वारी पेक्षा सातत्यपूर्ण दूध निर्मिती आणि दुधाचे प्रथिन वाढ होते परंतु दुधाच्या स्निग्धांश यांमध्ये बदल होत नाही. काही धान्य जसे की गहू मध्ये कार्बोदके असतात याचा आणि त्याच्यावरील अति प्रमाणातील प्रक्रिया विस्तृत प्रमाणात वापराचा परिणाम दुधाच्या स्निग्धांश आणि दूध निर्मिती कमी होण्यावर होतो. कार्बोदके आणि प्रथिनांचे माध्यम तसेच तंतुमय पदार्थ कर्बोदकांचे आहारातील प्रमाण यांचे निरीक्षण करावे जेणेकरून योग्य किणवन पद्धतीची खात्री होते. त्यामुळे दुधाची प्रत वाढण्यास मदत होते

दूध उत्पादन वाढवण्यासाठी : व्यवस्थित भाकड काळ ठरवावा वेताच्या पहिल्या आठवड्यात दुधाचा ताप (रक्तातील कॅल्शिअम कमी होणे) येणार नाही याची काळजी घ्यावी.

व्यायल्यानंतर गाईची निगा राखावी. ओटीपोटातील आरोग्य आणि आम्लता प्रतिबंधित करावी. चयापचयाचे आजार ओळखून त्यावर तातडीने उपाययोजना करावी. वेताच्या वेळी शरीर स्थिती गुण बीसीएस ३.० ते ३.२५ यादरम्यान ठेवावा.



# गोरगरीबांच्या अतिक्रमणावर हातोडा; भुमाफियांना पायघड्या? समान न्याय कुठ आहे?

## प्रशासनाच्या दुटप्पी धोरणाविरोधात मक्याचे कणसं भाजुन मोफत वाटप करत लक्ष्यवेधी आंदोलन






बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील जिल्हा आणि नगरपालिका प्रशासन अतिक्रमण हटविण्याच्या मोहिमेत हातावर पोट भरणाऱ्या चहा-नाष्टा चालक, टपरीधारक, फळ विक्रेते, फुलहार विक्रेते अशा गोरगरिबांवर निर्दयपणे कारवाई करत आहे. मात्र शहरातील राखीव खुल्या जागा आणि बिंदुसरा नदीपात्रात भुमाफियांची बेकायदेशीर बांधकामे मात्र विनाविघ्न सुरूच आहेत.शहरातील रस्त्यांच्या मधोमध उभे असलेले विद्युत रोहित्र, विजेचे खांब, चौकाचौकात ठाण मांडून बसलेली मोकाट जनावरे, तसेच खड्ड्यांनी भरलेले रस्ते या सर्व समस्यांकडे प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करण्यात आला.या दुटप्पी धोरणाच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते व मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र राज्य डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज (दि.१२, मंगळवार) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मक्याची कणसे भात्यावर भाजुन मोफत वाटप करत लक्ष्यवेधी आंदोलन आले. जिल्हाधिकारी व मुख्याधिकारी नगरपालिका बीड यांच्या मार्फत पालकमंत्री अजितदादा पवार यांना निवेदन देण्यात आले.

आंदोलनात शेख युनुस, सुदाम तांदळे, शेख मुबीन, शेख मुस्ताक, शिवशर्मा शेलार, पांडुरंग हराळे, रामधन जमाले, रामनाथ खोड , बाळासाहेब मोरे,माजी सैनिक अशोक येडे, आप्पासाहेब मतकर,मोमीन रफीक, दिलीप जोशी, मोमीन आरबाझ,प्रा.डी.जी.तांदळे, मोमीन अलतमश, आदींचा सहभाग होता. शहरातील मुख्य रस्त्यावरील नाल्यांवर किंवा रस्त्याच्या बाजूला अनधिकृत व्यावसायिकांवर कारवाई करताना, रस्त्यांच्या मधोमध असलेले विद्युत रोहित्र, विजेचे खांब, तसेच मोकाट जनावरे आणि कुत्रे याकडे मात्र प्रशासन दुर्लक्ष करत आहे. परिणामी वाहतुकीत अडथळे निर्माण होऊन अपघातांचे प्रमाण वाढत आहे. शहरातील मंदिर, उद्यान आदींसाठी राखीव खुल्या जागा काही नगररचनाकार, भू-अभिलेख अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मिलीभगतीने काही भुमाफिया व पदाधिकाऱ्यांनी बेकायदेशीररीत्या स्वतःच्या नावावर करून घेतल्याचा आरोप आहे. या प्रकरणात बनावट व कार्ड तयार करण्यात आल्याचे उघड झाले असून तक्रारीनंतर केवळ समिती नेमण्यापुरतेच काम झाले. १५ दिवसांत अहवाल देण्याचे आश्वासन देऊनही ४.५ महिने उलटून कारवाई झाली नाही. तसेच बिंदुसरा नदीपात्रातील अनधिकृत बांधकामांवर विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांनी कारवाईचे आदेश दिले असतानाही, नगरपालिका प्रशासनाकडून अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

## हरित महाराष्ट्र अभियानात केएसके महाविद्यालयाचे विद्यार्थी सहभागी



बीड । प्रतिनिधी

दिनांक ७ ऑगस्ट २०२५ रोजी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार व महाराष्ट्र राज्याचे उद्योग मंत्री मा.उदय सामंत,राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे विधानसभा अध्यक्ष मा.डॉ.योगेश भैय्या क्षीरसागर,मा.जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन,मुख्याधिकारी जितीन रहेमान, व विविध मान्यवरांच्या उपस्थितीत बीडमधील खंडेश्वरी मैदान येथे हरित महाराष्ट्र हरित बीड या अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. या अभियाना अंतर्गत एक पेड माँ के नाम या ब्रीद वाक्याप्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्यांने आपल्या आईच्या नावाने एक झाड लावून त्याचा फोटो वेबसाईडवर अपलोड करावयाचा होता.त्या दिवशी एका दिवसात तीस लाख वृक्ष लागवड झाल्याची नोंद मा.जिल्हाधिकारी बीड यांनी जाहीर केले.

या कार्यक्रमास विद्यार्थ्यांना प्रोत्साहन व शुभेच्छा नवगण शिक्षण संस्थेच्या सहसचिव डॉ.दीपा क्षीरसागर प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर, प्रशासकिय अधिकारी डॉ.सुधाकर गुट्टे, डॉ.विश्वांभर देशमाने, उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर,पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ.खान ए.एस., उपप्राचार्य डॉ.नारायण काकडे, पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर दिल्या. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्रा.आसाराम खुटाळे तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## परळी येथील ऐतिहासिक दर्गा नासर प्रकरणी चौकशी समिती गठीत करा-सय्यद सलीम बापू

बीड । प्रतिनिधी

परळी येथील ऐतिहासिक दर्गा नासर जंग प्रकरणी विशेष चौकशी समिती गठींकरून दोषींवर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावे अशी मागणी आंबेडकरी विचार मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीम बापू यांनी केली आहे.परळी येथे महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळांतर्गत येणारी ऐतिहासिक देवस्थान नासर जंग दर्गा असून सदरील दर्गेला खिदमत माश एकूण १७८ एकर इनामी जमीन आहे.गेल्या काही वर्षांपासून सदरील देवस्थान मिळकतीवर येथील स्थानिक भूमाफिया यांचा डोळा असून ते सतत देवस्थान इनामी जमीन लाटण्याचा प्रयत्न करीत आहे. ऐतिहासिक दर्गा नासर जंगच्या मिळकतीवर अतिक्रमण करून टोले जंग इमारती बांधली जात असून सदरील मिळकतीच्या बोगस फेरफार करून पी.टी.आर व पी.आर कार्ड सुद्धा देण्यात आले आहे.तरी या प्रकरणी आंबेडकरी विचार मोर्चाच्या वतीने वेळोवेळी निवेदने देऊन प्रकरण उघडगीस आणण्याचे काम केले आहे.



येथील भूमाफिया यांनी परळी नगरपरिषद येथील अधिकारी व कर्मचारी यांच्या संगनमताने ऐतिहासिक दर्गा नासर जंगचे ऐतिहासिक व पुरातत्व पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केले.याप्रकरणी मी स्वतः परळी नगर परिषदेचे मुख्य अधिकारी यांना कॉल करून सदरील प्रकरण न्यायप्रविष्ठ असताना ऐतिहासिक पुरावे का नष्ट केली जात आहे ? असे प्रश्न विचारले असता त्यांनी उडवा - उडवीची उत्तरे दिली.व त्यानंतर मी वक्फ मंडळाचे मुख्य अधिकारी यांना कॉल करून सदरील प्रकरणाची माहिती दिली असता त्यांनी तात्काळ जिल्हा वक्फ अधिकारी यांना प्रकरणाची चौकशी करून गुन्हे दाखल करण्याचे आदेश देणार असल्याची माहिती दिली. तरी सद्यस्थितीत जिल्हा वक्फ अधिकारी यांनी सदरील प्रकरणात कोणतीही कायदेशीर कार्यवाही केलेली नाही.तरी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाअंतर्गत येणाऱ्या ऐतिहासिक दर्गा नासर जंगचे ऐतिहासिक व परतत्व पुरावे नष्ट करण्याचे प्रयत्न हे अत्यंत गंभीर असून हे सर्व प्रकार परळी येथे भूमाफिया,तलाठी,मंडळ,अधिकारी,तालुका निबंध आणि परळी नगर परिषद येथील अधिकारी व कर्मचारी यांच्या संगनमताने होत आहे.या प्रकरणी विशेष चौकशी समिती गठीत करून दोषींवर तात्काळ गुन्हे दाखल करण्यात यावे अन्यथा येत्या १८ ऑगस्ट शुक्रवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदादा मरण उपोषण करण्यात येईल असे आंबेडकरी विचार मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीम बापू यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.यावेळी एड.सय्यद अल्ताफ, सय्यद इलियास भाई व समीर सिद्धीकी सह आंबेडकरी विचार मोर्चाचे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयामध्ये आंतरराष्ट्रीय युवा दिन साजरा

नेकनूर । प्रतिनिधी

प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे आंतरराष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात आला या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य डॉ.ढास डी.के. हे उपस्थित होते. तर या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्राध्यापक मुजावर एस.टी. हे लाभलेली होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक इनकर व्ही.एस. यांनी केले यांनी आपले विचार मांडत असताना आंतरराष्ट्रीय युवा दिन का साजरा करायचा व युवकांनी आपल्या जबाबदाऱ्या आणि येणाऱ्या अडीअडचणी, सामाजिक समस्या, पर्यावरणाचे संवर्धन कसे करायचे हे या आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी समजून घेतले पाहिजे असे सांगितले.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्राध्यापक मुजावर एस.टी.यांनी आपले विचार मांडत असताना आंतरराष्ट्रीय युवा दिन संयुक्त राष्ट्र



संघटनेच्या सभेमध्ये २००९ साली प्रथम प्रस्ताव मांडला याला सहमती देण्यात आली .आणि २०१० पासून प्रथम आंतरराष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरा करण्यात येऊ लागला आंतरराष्ट्रीय युवा दिन हा जगातील युवकांसाठी महत्त्वाचा आहे.तो युवकांनी समजून घेतला पाहिजे व आपल्या जीवनामध्ये युवकांच्या समस्या व सामाजिक समस्या नीट समजून घेतल्या पाहिजे असे विद्यार्थ्यांना समजून सांगितले तसेच पुढे या कार्यक्रमाचे अध्यक्ष आदरणीय प्राचार्य डॉक्टर दास डी.के. यांनी आपले विचार मांडत असताना विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त जागतिक लेवलवर भारत हा युवकांचा देश म्हणून संबोधला गेलेला आहे. म्हणून युवकांनी येणाऱ्या संकटांना सामोरे कसे जायचे व आपल्या जबाबदाऱ्या पार पाडत असताना आपले यश संपादन कसे करायचे याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजून सांगितले तसेच या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक रामरुले डी.के. यांनी केले या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ग्रंथालय शास्त्राचे जनक म्हणून डॉ. रंगनाथन यांची ओळख आहे.- प्राचार्य डॉ. जाकेर पठाण

चौसाळा

ग्रंथालय हे पुस्तकाचं संग्रहालय न होता ती एक संस्था व्हावी, चळवळ व्हावी यासाठी



अहोरात्र झिजणारे डॉ. एस. आर. रंगनाथन होते म्हणूनच त्यांना भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक म्हणून ओळखले जाते असे प्रतिपादन कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बदनापूर येथील प्राचार्य डॉ. जाकेर पठाण यांनी केले. नवगण शिक्षण संस्थेचे कला व विज्ञान महाविद्यालय चौसाळा येथे ग्रंथालय विभागातर्फे डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंती निमित्त राष्ट्रीय ग्रंथालय दिनानिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी ते बोलत होते. या वेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. पंडित खाकरे, पदव्युत्तर संचालक डॉ. सुधाकर वणवे, कमविचे उपप्राचार्य गणपती ढवळशंख उपस्थित होते. पुढे बोलताना प्राचार्य डॉ. पठाण म्हणाले की, डॉ. रंगनाथन यांनी ग्रंथालय शास्त्राची पंचसूत्री तयार केली. ग्रंथालयांनी जास्तीत जास्त लोकाभिमुख बनवून त्यांचा फायदा सर्वसामान्याना होण्यासाठी प्रयत्न केले अध्यक्षीय भाषण करताना प्राचार्य डॉ. पंडित खाकरे म्हणाले की, एस.आर. रंगनाथन यांनी भारतीय ग्रंथालय चळवळीला एक दिशा दिली विशेष म्हणजे मराठी भाषेत ग्रंथालय शास्त्रावर अनेक पुस्तके आणि लेख लिहिले त्यामुळेच मराठी भाषेत ग्रंथालयशास्त्र अधिक सोपे झाले या प्रसंगाचे औचित्य साधून संशोधन केंद्राचे प्रमुख प्रा.डॉ. प्रशांत साबळे यांनी पाच ग्रंथ महाविध्यालयास भेट दिले . या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल प्रा. डॉ. हिरवे पंढरीनाथ यांनी केले तर सूत्रसंचलन प्रा.सुधीर माने यांनी केले. शेवटी आभार प्रा. डॉ. सय्यद शहानूर यांनी व्यक्त केले यावेळी प्राध्यापक, कर्मचारी , विद्यार्थी मोठ्या संखेने उपस्थित होते .

### टीसी हरवला आहे

सोनवणे बाळराजे ओमप्रकाश या नावाचा १२ वी पासचा टीसी स्वराज्य नगर ते उमाकिरण संकुल शाहुनगर दरम्यान हरवला आहे कोणाला सापडल्यास खालील नंबर वर संपर्क साधावा.

**संपर्क**
**९४०३७८८२७४**

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/३६६
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- ०२/०७/२०२५

नाव बदलण्याचा

**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) भाईदास हनुमंत जाधव सर्व्हे नं. ४०/१ सहन प्लॉट नं. ३३ सिटी सर्व्हे नं. ३४९० नं.प.मि.नं.१८-१५८-३३ चे हस्तांतर करणे बाबात.

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-१५८-३३) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुःसिमा
पुर्व- प्लॉट नं. ३४
पश्चिम : प्लॉट नं. ३२
दक्षिण- ९ मिटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
उत्तरः प्लॉट नं. २४

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/४५६
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- ०५/०८/२०२५

नाव बदलण्याचा

**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) मिराबाई भिमदेव पवार नं.प.मि.नं.७-२३१ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (७-२३१) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- महादेव मंदिराची जागा तसेच पुंजाराम रामा खरात यांचे घर
पश्चिम : रस्ता
दक्षिण- विक्रेत्याची उर्वरित जागा
उत्तरः विक्रेत्याची जागा

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**

## आता महाराष्ट्रातील जास्तीत जास्त विद्यार्थी होणार आयएएस व आयपीएस- डॉ संतोष मुंडे

परळी । प्रतिनिधी

परळी शहरातील न्यू संकल्प स्पर्धा परीक्षा केंद्रातील एकूण ५१ विद्यार्थ्यांची महावितरण व महापारेषण मध्ये निवड झाल्याबद्दल साई पॅलेस परळी वैजनाथ येथे घेण्यात आलेल्या सत्कार समारंभाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य दिव्यांग कल्याण मंत्रालय उपाध्यक्ष डॉ.संतोष मुंडे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले याप्रसंगी संकल्प अभ्यासिका व करिअर अकॅडमीचे अशोक मुंडे सर पापनाथेश्वर माध्यमिक विद्यालय नाथरा चे सहशिक्षक प्रा.डॉ नरेश काळे सर,न्यू संकल्प स्पर्धा परीक्षा केंद्राचे संचालक विजय वाघमारे सर तसेच पत्रकार कैलास डूमने व धीरज जंगले यांची प्रमुख उपस्थिती होती.



उद्घाटनानंतर महावितरण व महापारेषण मध्ये सरकारी नोकरीत निवड झालेल्या ५१ विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा कार्यक्रमाचे उद्घाटक व प्रमुख मार्गदर्शक दिव्यांग कल्याण मंत्रालयाचे उपाध्यक्ष डॉ. संतोष मुंडे व मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना दिव्यांग कल्याण मंत्रालय अध्यक्ष डॉ.संतोष मुंडे यांनी न्यू संकल्प स्पर्धा परीक्षा केंद्राच्या या उत्तुंग यशाबद्दल केंद्राचे संचालक विजय वाघमारे सर तसेच सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व अशा स्पर्धा परीक्षा केंद्रांमुळे आता महाराष्ट्रातील जास्तीत जास्त विद्यार्थी आयएएस, आयपीएस होणार यात शंका नाही असे उद्गार काढले आणि सर्व निवड झालेल्या विद्यार्थ्यांना आपापल्या कार्यक्षेत्रात आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडा आणि यावरच न थांबता उच्च पदावर विराजमान व्हा असे आव्हानही केले. तदनंतर कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून लाभलेले पापनाथेश्वर माध्यमिक विद्यालय नाथरा चे सहशिक्षक काळे सर तसेच संकलप अभ्यासिका चे अशोक मुंडे सर यांनीही उपस्थित विद्यार्थ्यांना अमूल्य असे मार्गदर्शन केले व निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.शेवटी न्यू संकल्प स्पर्धा परीक्षा केंद्राचे संचालक विजय वाघमारे सर यांनी अध्यक्षीय समारोपात सर्व यशस्वी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे व पालकांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## मिल्लिया महाविद्यालयात चलो घर बसाये व्याख्यानमालेचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

येथील मिल्लिया कला, विज्ञान व व्यवस्थापणशास्त्र महाविद्यालयात जेंडर सेन्सीटायझेशन सेल च्या वतीने दिनांक १२ ऑगस्ट २०२५ मंगळवार रोजी ''चलो घर बसाये'' या विषयावर व्याख्यान मालेचे उद्घाटन झाले. या अंतर्गत पहिले व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहम्मद इलियास फाजिल उपस्थित होते, तसेच महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रोफेसर हुसैनी एस. एस. व जेंडर सीन्सिटिझेशन सेलच्या अध्यक्ष प्रोफेसर सीमा हाश्मी यांची उपस्थित होती. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून श्रीमती कुरैशी फरहा सोहेल ( इस्लामिक काउंसलर, काझी नगर, बीड) तसेच कार्यक्रमाच्या संयोजिका डॉ. सय्यद तनवीर, डॉ. एजाज परवीन, डॉ. फर्रा फातिमा नेहरी, डॉ जाधव शामल, डॉ.काझी अर्शिया यांची उपस्थिती होती.




कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. इलियास फाजील यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. महिलांमुळे घराला घरपण येते. घरात एकोपा टिकवायचा असेल तर महिला व पुरुष दोघांनीही त्यासाठी मेहनत घ्यावी लागते. छोट्या छोट्या कारणांमुळे होणाऱ्या पती-पत्नीच्या भांडणात घरे कशी उध्वस्त होतात व त्यापासून आपण कसे मार्ग काढू शकतो याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुण्या श्रीमती कुरैशी फरहा सोहेल यांनी इस्लाम धर्मामध्ये महिलांची भूमिका तसेच त्यांची जबाबदारी या विषयावर पवित्र कुराण व हदिसचा हवाला देत मार्गदर्शन केले. इंटरनेट, मोबाईल, सामाजिक माध्यमे यांच्या अधिक वापरामुळे आज समाजामध्ये होणाऱ्या विविध समस्यावर त्यांनी मार्गदर्शन केले. आजच्या युगामध्ये पती आणि पत्नीच्या भांडणात मोबाईल फोनची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना सांगितले की, लग्नानंतर तुम्ही आपले सासर सुद्धा आपलेच घर आहे असे जर समजून राहिलात तर कोणत्याही प्रकारची भांडणे, मनमुटाव होणार नाही. आपल्या सासू-सासऱ्यांना आई-वडील, नणंद आणि दिराला भाऊ-बहीण मानले तर सासर सर्वांसाठीच स्वर्ग बनेल. समाजामध्ये घटस्फोटाच्या वाढत्या प्रमाणाबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. घटस्फोटाचे प्रमाण कमी करण्यासाठी पती-पत्नीमध्ये सामंजस्य असण्याची गरज त्यांनी स्पष्ट केली. आपल्या कॉलेज जीवनात मध्येच जर तुम्ही अनुशासन युक्त जीवन जगले तर पुढील संपूर्ण जीवन खुशालीने जाते. विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना त्या म्हणाल्या की सकाळी लवकर उठले पाहिजे, पाच वेळेची नमाज पठण केली पाहिजे तसेच रोज पवित्र कुराणाची पठण केले पाहिजे अशा प्रकारे जीवनामध्ये जर आपण अनुशासन आणू शकलो तर आपले संपूर्ण जीवन हे अनुशासनात्मक होईल आणि त्यामुळे पुढील जीवन सुद्धा सुखकर होईल. प्रत्येक विद्यार्थिनीने अशा प्रकारे आपल्या जीवनामध्ये अनुशासन आणण्याचा प्रयत्न करणे खूप गरजेचे आहे. दुसऱ्यांकडे बघून आपण आपले जीवन जगू नये.आपल्याजवळ जेवढे आहे तेवढ्यातच आनंदी राहून आपण आपले जीवन जगले पाहिजे. महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी कॉलेजमध्ये तसेच घरामध्ये कसे वागावे याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तथा सूत्रसंचालन डॉ. काझी अरशिया जबीन यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. सीमा हाश्मी यांनी केले.कार्यक्रमास प्रा. फारुख सौदागर, प्रा. शोएब पीरजादे, विद्यार्थीनी मोठया संख्येने उपस्थिती होती.

# न्यायालयाने निकाल देवूनही कनिष्ठ लिपिकास हजर करण्यास नकार!

## १५ ऑगस्टला कुटुंबासह आत्मदहनाचा इशारा

**गेवराई । प्रतिनिधी**

तालुक्यातील तांदळा येथिल साहेबराव पाटिल माध्यमिक विद्यालयात सन २००९ ला कनिष्ठ लिपिक या पदावर सुधाकर मधुकर शेळके यांना शिक्षण संस्थेत जॉईनी देण्यात आली २०१२ पर्यंत त्यांनी नियमित सेवा केली, परंतु संस्थेच्या अर्तगत वादातून त्यांना काढून टाकण्यात आले, नंतर त्यांनी पिठासीन अधिकारी शाळा न्यायाधिकरण न्यायालय लातुर यांनी दि, ४ फेब्रुवारी २०२५ रोजी निकाल देवुन तात्काळ रुजु करण्याचे आदेश दिले, मात्र मुख्याध्यापक यांना वांरवार विंनती करुनही रुजु न केल्याने त्यांनी दि, १५ ऑगस्ट रोजी शिक्षणाधिकारी बीड यांच्या कार्यलया समोर कुटुंबासह आत्मदहनाचा इशारा दिला आहे,

वविद्यार्थांच्य शिक्षणाच्या सोयी साठी तांदळा येथे माध्यमिक विद्यालय मान्यता दिली, सन २००९ साली सुधाकर मधुकर शेळके यांनी या संस्थेत कनिष्ठ लिपिक म्हणून नेमणूक दिली, या नंतर तब्बल ३ वर्ष प्रमाणिक सेवा बजवुनही संस्थेतील राजकिय क्रुरघोडीची राज करण्यामुळे त्यांना काढून टाकण्यात आले, या नंतर अनेक वेळा संस्था चालक व मुख्याध्यापक यांना विंनती करूनही त्यांना घेण्यात आले नाही, त्यामुळे त्यांनी लातुर येथिल मा, पिठासीन अधिकारी शाळा न्यायाधिकरण यांच्या कडे अन्याय विरोधात दाद मागून सेवा केल्याचे पुरावे दिले, त्यानंतर पिठासीन अधिकारी यांनी दि, ४ फेब्रवारी रोजी त्यांच्या बाजुनी निकाल देत तात्काळ रुजु करुन घेण्याचे आदेश दिले, परंतु मुख्याध्यापक व संस्थेला अनेक वेळा विंनती करुनही त्यांना रुजु करुन घेतले, नाही, त्यांना नंतर शिक्षणाधिकारी बीड यांच्या कडे त्यांनी या बाबत पाठपुरावा केला त्यामुळे शिक्षणाधिकारी यांनी गेवराई च्या गटशिक्षणाधिकारी यांना तुम्ही शाळेवर जावुन तुमच्या समोर रुजु करुन अहवाल या कार्यालयास पाठवावा असे आदेश असतांना त्यांना रुजु करून न घेतल्याने शेवटी सुधाकर मधुकर शेळके यांनी १५ ऑगस्ट रोजी, शिक्षणाधिकारी कार्यलय समोर कुंटुबसह आत्मदहनाचा इशारा दिला आहे,

### शिक्षणाधिकाऱ्याच्या आदेशाला गेवराई गटशिक्षणाधिकाऱ्याकडून केराची टोपली!

गेवराई गटशिक्षणाधिकारी यांना शिक्षणाधिकारी यांनी ४ऑगस्ट रोजी आदेश काढुन तात्काळ रुजु करण्याचे आदेश दिले आसतानाही या मगरुर गटशिक्षणाधिकारी यांनी रुजू न करुन घेतल्याने एका कुटुंबाला सामुहीक आत्मदहन करण्याची वेळ स्वातंत्र्यानंतर ८० वर्षाने येते हे लक्षण म्हणजे निर्लज्ज पणाचे म्हणावे लागेल.

# अपहरण झालेल्या दोन्ही मुलीचा तपास लागत नाही तोच तिसरीचे अपहरण !

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

**आष्टी तालुक्यातील अंभोरा ठाणे हद्दीतून दोन अल्पवयीन मुलीचे अपहरण झाले. याला अनेक दिवसाचा कालावधी झाला, पोलीसांना कसलाच तपास लागत नसल्याने पुन्हा दोन दिवसापूर्वी एका मुलीचे अपहरण झाल्याने मुली सापडतील कि नाही म्हणून आई, वडिलाच्या आशा मावळल्या असून ठाण्यातील पोलिसांवरील विश्वास उडाला**

एसपी साहेब आमच्या पोरीच्या जिवाचे काही बरेवाईट झालय ते तरी दाखवा!

आई, वडिलाच्या आशा मावळल्या, पोलिसांवरील विश्वास संपला आहे. आमच्या मुलीच्या जिवाचे काही बरेवाईट झाले की काय हे तरी एसपी साहेब तुम्ही दाखवा अशी म्हणण्याची नामुष्की पंडित कुटुंबाबर ओढावली आहे. आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलिस ठाणे हद्दीतील दोन वेगवेगळ्या गावातून दोन मुलीचे अज्ञात कारणांसाठी तरूणांनी अपहरण केल्याची घटना घडून एका घटनेला दोन तर दुसऱ्या घटनेला दीड महिना उलटून देखील कसलाच तपास पोलिसांना लागला नाही. तपास लागत नसेल तर तो वरिष्ठांच्या आदेशानुसार स्वतंत्र पथकाकडे वर्ग करायला हवा पण हे सुध्दा होत नाही. दोन्ही प्रकरणात पोलिसांनी चहापाणी केल्याचे समजत आहे. हे प्रकरण ताजे असतानाच आता पुन्हा एका अल्पवयीन मुलीचे अपहरण ठाणे हद्दीतून झाल्याचे समोर आले असुन याप्रकरणी रविवारी ११ रोजी आशी पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध कलम १३७(२) नुसार अंभोरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अंभोरा पोलिसांवरील विश्वास आता डळमळला असून एसपी साहेब आमच्या पोरीचे काही बरेवाईट झाले आहे काय हे तरी दाखवा असे म्हणण्याची वेळ पिडीत कुटुंबावर आली आहे.

# अंबाजोगाई शहरालगतच्या चनई-आडस रोडवर अज्ञात वाहनाने तरुणास चिरडले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरापासून जवळच असलेल्या चनई आडस रोडवरील उमराई फाट्यानजीक आज पहाटे भरधाव वेगाने येणाऱ्या अज्ञान वाहनाने एक पादचारी युवकास चिरडल्याची भीषण घटना घडली आहे. प्राप्त माहितीनुसार रस्त्याने पायी जात असलेल्या अंदाजे ३० वर्षाच्या आसपास एका अनोळखी तरुणाला अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, त्या तरुणाचा जागीच मृत्यू झाला. या अपघातानंतर सदर वाहनचालकाने आपले वाहन न थांबवता घटनास्थळावरून पोबारा केला. या भीषण अपघातात तरुणाच्या मृतदेहाचा चेंदामेंदा झाला होता. हे भीषण दृश्य पाहून अनेक जण हळहळ व्यक्त करत होते.




दरम्यान घटनेची माहिती मिळताच अंबाजोगाई पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन त्या तरुणाचा मृतदेह ताब्यात घेऊन तो उत्तरीय तपासणी तथा शवविच्छेदन करण्यासाठी स्वाराती रुग्णालयात हलवला. मृत व्यक्तीची ओळख दुपारपर्यंत तरी पटलेली नव्हती. अंबाजोगाई पोलिसांकडून पलायन केलेल्या वाहनाचा शोध सुरू आहे.या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, धोकादायक वेगाने वाहन चालवणाऱ्या बेफिकीर वाहनचालकांवर कारवाईची मागणी स्थानिक नागरिकांच्या वतीने केली जात आहे. पोलिसांकडून या प्रकरणी अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# अंबाजोगाई मंडी बाजार परिसरातील दुकानास भीषण आग; दुकानातील सर्व मालाचा झाला जळून कोळसा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**अंबाजोगाई शहरातील मंडी बाजार परिसरातील प्रगती शॉपिंग मॉल फेमस फर्निचर होम अप्लायन्सेस हा दुकानात आज सकाळी सहाच्या सुमारास भीषण लाग लागली. ही आग इतकी मोठी होती की दुकानातील सर्वच्या सर्व माल आगीच्या भक्ष्यस्थानी सापडून त्या संपूर्ण मालाचा जळून कोळसा झाला होता. प्रथम दर्शनी ही आग शॉर्टसर्किटमुळे लागल्याचे बोलले जात आहे.**



अंबाजोगाई शहरातील मंडी बाजार परिसरातील अमन ज्वेलर्स च्या पाठीमागे फयाज मोईन यांचे संसारोपयोगी तथा गृहोपयोगी वस्तूंचे दुकान होते. या दुकानात प्लास्टिक, फायबर, लोखंडी तसेच कागदी तथा कपड्यांच्या वस्तू मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होत्या. सकाळी सहाच्या सुमारास या दुकातून धूर येत असल्याचे प्रत्यक्ष दर्शीकडून बोलल्या जात होते. काही वेळातच आगीने रौद्ररूप धारण केल्याने या दुकानातून आगीचे तसेच धुराचे लोट बाहेर पडू लागले. दुकान मालक घरून दुकानात येईपर्यंत दुकानातील सर्वच्या सर्व मालाची राखरांगोळी झाली होती. अंबाजोगाई नगर परिषदेच्या अग्निशमन दलाला पाचारण करून अग्निशमन दलाच्या जवानांनी ही भडकलेली आग आटोक्यात आणली व पुढील आसपासच्या दुकानात ही आग पसरण्याआधीच त्यावर नियंत्रण मिळवले. या आगीमुळे फैयाज मोमीन यांचे अतोनात नुकसान झाल्याने त्यांच्यावर भलेमोठे आर्थिक संकट ओढवले असल्याचे नागरिकांतून बोलल्या जात आहे.

# कर्तव्यदक्ष पोलीस नाईक जाधव, दराडे यांना पदोन्नती वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडून पुष्पगुच्छ देऊन सन्मान

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी पोलीस ठाण्यातील पोलीस नाईक विकास जाधव, संतोष दराडे या खाकी वर्दीतील कर्तव्यदक्ष आणि इमानदार पोलीस कर्मचाऱ्यांना पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्याकडून हवलदार म्हणून सेवा पदोन्नती देण्यात आली. त्याबद्दल पोलीस ठाण्यात वरिष्ठांकडून पुष्पगुच्छ देऊन या दोन्ही कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

मागील अनेक वर्षापासून आष्टी पोलीस ठाण्यातील अतिशय प्रतिकूल परिस्थितीवर मात करून पोलीस दलात कार्यरत असलेले



कर्तव्यदक्ष आणि इमानदार पोलीस नाईक विकास जाधव, संतोष दराडे या कर्मचाऱ्यांना पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्याकडून हवालदार म्हणून पदोन्नती मिळाली आहे. त्याबद्दल आष्टीचे ठाणेदार शरदराव भुतेकर, सपोनि विजय नरवडे, विक्रांत हिंगे, नानासाहेब सूर्यवंशी, पोलीस उपनिरीक्षक श्रीकृष्ण शिंदे यांच्यासह पोलिस ठाण्यातील इतर कर्मचाऱ्यांकडून पुष्पगुच्छ देऊन दोन्ही पदोन्नती प्राप्त पोलिस हवलदारांचा यथोचित सन्मान करून अभिनंदन करण्यात आले.

# दखल न घेतल्याचा निषेध म्हणून १५ ऑगस्ट रोजी १५ मिनिटे भोपळा, बेशरम घेऊन साचलेल्या चिखल -पाण्यात लोटांगण घेणार

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

जसे आपण शेरी या गावातील पुलाची पहाणी करुन प्रश्न मार्गी लावला तसाच कडा येथील प्रश्न मार्गी लावावा.मी संबंधित अधिकाऱ्यांना व्हाट्सअप वर फोटो,व्हिडिओ पाठवून संपर्क करून विनंती केली तरी दखल घेतली नाही. वृत्तपत्रातून त्याबाबत बातम्या प्रकाशित झाल्या तरीसुद्धा दखल घेतली नाही याचा निषेध म्हणून १५ आँगस्ट २०२५ शुक्रवार रोजी सकाळी ११:३० वाजता राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५६१ कडा (ता.आष्टी) गावातील दावलमलिक (शादवल) दर्गा समोर साचलेल्या चिखल-पाण्याच्या ढवात भोपळा,बेशरम घेऊन १५ मिनिटे लोटांगण घेऊन निषेध व्यक्त करणार बाबतचे निवेदन सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार रहेमान सय्यदअली सय्यद यांनी तहसीलदार आष्टी व त्यांच्या मार्फत जिल्हाधिकारी बीड, उपविभागीय अधिकारी पाटोदा,अभियंता आर. व्हि भोपळे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५६१ यांना दिले असून निवेदनात पुढे असे नमूद केले आहे की,राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५६१ या मार्गावरील साबलखेड कडा आष्टी रस्त्याचे काम चालू असून आष्टी तालुक्यातील कडा या गावातील दावलमलिक (शादवल)दर्गा समोर रस्त्याचे काम करतांना दोन्ही बाजूंनी गटारी बनवल्या पावसाचे पाणी जाण्यासाठी त्या गटारीला जागोजागी चार इंचाचे छिद्रे ठेवली होती परंतु रस्ता बनवताना चक्क ते सगळेच्या सगळेच छिद्रे रस्त्यात बुजून टाकली. त्यामुळे पावसाचे पाणी जाण्यासाठी मार्गच राहिला नाही. परिणामी दर्गा समोर कायमच पाण्याचा ढव चिखल साचून राहत आहे. ये-जा करतांना कसरत करावी लागत आहे पाय घसरून पडण्याची भिती, वाहनांचे अपघात होण्याची दाट शक्यता असल्याने मी संबंधित ◀◀ पान ३ वर

### जिल्हाधिकारी,उपविभागीय अधिकारी, तहसीलदार,अभियंता आर.व्हि भोपळे यांना दिले निवेदन





# स्व.बाबूरावजी आडसकर यांची पुण्यतिथी सामाजिक व सांप्रदायिक उपक्रमाने साजरी

### जिल्ह्यातील सर्वपक्षीय नेते, कार्यकर्ते यांची उपस्थिती

केज । प्रतिनिधी दि.

लोकनेते, माजी आमदार, स्व. बाबूरावजी आडसकर (तात्या) यांच्या ९ व्या पुण्यतिथी निमित्त ह.भ.प.महंत भगवान महाराज वरपगाव संस्थान, यांच्या सुश्राव्य किर्तनाचे आयोजन तसेच, सर्व रोग निदान आरोग्य शिबीर व भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन दि. १२ रोजी आडस येथे करण्यात आले. यामध्ये हजारो नागरिकांनी सहभागी होत आरोग्य तपासणी केली.

यावेळी मोफत औषधोपचार करण्यात आले. शेकडो युवक, नागरीक, महीला यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. तसेच ह.भ.प.वरपगावकर यांच्या सुश्राव्य कीर्तनाचा व स्नेह भोजनाचा आस्वाद पंचक्रोशीतील उपस्थित महीला-पुरूष व सर्व नागरिकांनी घेतला. यावेळी जिल्ह्यातील सर्वपक्षीय राजकीय नेते, कार्यकर्ते, पदाधिकारी, नागरीक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. लोकनेते स्व. बाबूरावजी आडसकर यांची सामाजिक व सांप्रदायिक उपक्रमाने पुण्यतिथी साजरी केली गेली त्यामुळे उपस्थित ◀◀ पान ३ वर





# इतिहास महाराष्ट्राचा स्पर्धेची बीडमध्ये उत्साही सुरुवात

## बालकलावंतांच्या कलागुणांनी रसिक मंत्रमुग्ध; ३०० हून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग

**बीड । प्रतिनिधी**

येथील नवगण शिक्षण संस्था संचलित सौ. के. एस. के. महाविद्यालयात बालरंगभूमी परिषदेच्या वतीने आयोजित 'इतिहास महाराष्ट्राचा' या स्पर्धेची प्राथमिक फेरी मंगळवारी (दि.१२) उत्साहात पार पडली. कार्यक्रमाचे उद्घाटन बीडचे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या हस्ते झाले. प्रमुख अतिथी म्हणून नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. योगेश क्षीरसागर उपस्थित होते. उद्घाटक आणि प्रमुख अतिथींनी सर्व बालकलावंतांना शुभेच्छा देत त्यांना प्रोत्साहन दिले.

नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला, शिल्पकला, वक्तृत्व, पोवाडे यांसारख्या विविध कलाप्रकारांची आकर्षक सादरीकरणे बालकलावंतांनी सादर केली. बीड, गेवराई, माजलगाव, उमरी आणि आसपासच्या गावांतील शालेय विद्यार्थ्यांसह काही सांस्कृतिक संस्थांनी सहभाग घेतला. या प्राथमिक फेरीत 'श्री शिवजन्मोत्सव ते श्री शिवराज्याभिषेक सोहळा' या विषयावर बालकलाकारांनी नाटक, पोवाडे, गाणी अशा विविध माध्यमांतून प्रभावी सादरीकरण केले. यावेळी बालरंगभूमी परिषदेच्या उपाध्यक्षा डॉ. दीपा क्षीरसागर, सहकार्यवाहक स्नेहलता पाठक, प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, प्रमुख कार्यवाहक संजय पाटील देवळांकर, कोषाध्यक्ष डॉ. व्ही. टी. देशमाने, सहकार्यवाहक शाहीर विलास सोनवणे आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. महाराष्ट्रभर आयोजित या स्पर्धेला उदंड प्रतिसाद मिळत असून बीड जिल्ह्यातील प्राथमिक फेरीत तब्बल ३०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मिलिंद शिवनीकर, अमित गाडे, सिद्धार्थ अग्रवाल, अनिता शिंदे, दुष्यंत रामटेके, विजय राख, दीपक जमदाडे, राहुल सोनवणे, सुरेश थोरात, सुरेश साळुंखे, नामदेव साळुंखे, किरण राठोड, इंद्रजीत भांगे, असलम शेख आदींनी परिश्रम घेतले.




# नदीतून वाळू चोरी करणारा ट्रॅक्टर पकडला

## प्रभारी अधिकारी राजेश गडवे यांचा वाळू माफियांना चौथा दणका



तलवाडा । प्रतिनिधी

सपोनि राजशे गडवे व त्यांचे सहकारी उमापुर हद्दीत गस्त घालत असतांना मौजे गायकवाड जळगाव येथील नदीतून वेळ १७.०० वा वाळू भरून टॅक्टर जळगाव फाटयाकडे जात असल्याची माहिती मिळताच प्रभारी सपोनि राजेश गडवे यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसोबत वाळूच्या टॅक्टर चा पाठलाग करून ट्रॅक्टर पकडला. यामध्ये सपोनि राजेश गडवे त्यांचे सहकारी पोउपनि पानपाटील साहेब, चालक सुरवसे, पोअं घोंगडे, पोह घनशाम केदार यांनी मोठी कारवाई केली , या कारवाईत विनापरवाना वाळू वाहतूक करणारा टॅक्टर पकडून पोह घनशाम केदार यांच्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) नुसार गुन्हा दाखल करून, टॅक्टर वर गुन्हा दाखल करून आकरा लाख नव्वद हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे. सपोनि गडवे यांच्या

आदेशाने पुढील तपासासाठी एन पी.सी गुजर यांच्याकडे देण्यात आला आहे.

वाळू माफियांना गडवे यांनी चौथा दणका दिला आहे. गेवराई तालुक्यातील चकलांबा पोलिस ठाण्याचे प्रभारी म्हणून एपीआय राजेश गडवे यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी पदभार घेतच दोन ◀◀ पान ३ वर

# बदल्या प्रक्रियेत विन्सिस कंपनीची चुक; मनस्ताप शिक्षकांना कंपनीच्या विरोधात कास्ट्राईब न्यायालयात जाणार -जाधवर

**बीड । प्रतिनिधी**

**विंसेस कंपनीच्या सॉफ्टवेअर मधील दोषामुळे शिक्षकांना मनस्ताप सहन करावा लागत असून या कंपनीच्या चुकीमुळे अनेक शिक्षक बदली पासून वंचित राहणार आहेत या कंपनीच्या विरोधात कास्ट्राईब कर्मचारी संघटना न्यायालयात जाणार असल्याची माहिती राज्याचे अध्यक्ष अनिल जाधव यांनी दिली.**



जिल्हा परिषदेतील शिक्षकांच्या बदल्या ग्रामविकास खात्याच्या आदेशाने राज्यस्तरावरुन केल्या जातात, बदलीसाठी संवर्ग १ ते ४ असे टप्पे पाडलेले आहेत. जूनपासून ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवडयापर्यंत संवर्ग १ ते ३ जदली प्रक्रिया शासन स्तरावर पूर्ण झालेली आहे. संवर्ग चार साठी बदली अर्ज भरण्याकरीता ५ ऑगस्ट ते १० ऑगस्ट पर्यंत मुदत होती. बदली प्रक्रिया राबविण्यासाठी पुणे येथील विन्सिस आय. टी. सर्वासिस प्रा.लि. कंपनी पुणे कडे शासनाने जबाबदारी सोपवलेली आहे. कंपनीचे सॉफ्टवेअर गतीने न चालने, ओटीपी न येणे, भरलेले बदलीतील पर्याय आपोआप बदलने या बाबीमुळे शिक्षक अत्यंत त्रस्त झालेले असून मानसिक तणावात आहेत. संवर्ग चारचे बदली पर्याय भरण्याची अंतीम मुदत १० ऑगस्ट २०२५ नरोजी रात्री ११.५९ पर्यंत होती. दरम्यानच्या कालावधीमध्ये विन्सीस कंपनीचे सॉफ्टवेअर अत्यंत कमी गतीने चालत होते. तसेच सॉफ्टवेअर च्या तांत्रिक अडचणीमुळे रात्री १०.३० नंतर काही शिक्षकांना ओटीपी प्राप्त झाले नाहीत. तसेच पूर्ण ३० पर्याय भरता आले नाहीत, पर्यायी पाचशे शिक्षक बदली प्रक्रियेमधून वंचीत राहीले. संवर्ग चार मधील शिक्षकांना बदली पर्याय भरण्यासाठी शासनाकडून मुदतवाढ देण्यात यावी अथवा भरलेल्या पर्यायापैकी पर्याय ग्राहय धरावेत व त्यांना बदली प्रक्रियेसाठी पात्र समजण्यात यावे. अशी मागणी कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघाचे राज्य अध्यक्ष अनिल जाधवर यांनी प्रधान सचिव ग्रामविकासविभाग, ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# भगवा आतंकवाद कभी था ना है ना रहेगा -समिर कुलकर्णी

पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी

**हिंदुस्थानामध्ये राहणारे प्रत्येक भारतीय आहेत त्याचा सर्वांना अभिमान आहे मालेगाव बॉम्बस्फोटामध्ये हिंदूवर नाहक आरोप केले गेले परंतु या देशात कधी भगवा दहशतवाद होता आणि आजही नाही अशा शब्दात हिंदू विरोधी बोलणाऱ्या व्यक्तीचा समाचार याच खटल्यातील आणि या खटल्यावर अनेक वेळा भाष्य करणारे समीर कुलकर्णी यांनी केला आहे.**

रामकृष्ण मोरे सभागृहात भगवा आतंकवाद या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये मालेगाव बॉम्ब स्फोट प्रकरणी निर्दोष मुक्त झालेले पिंपरी चिंचवडचे रहिवाशी हिंदुत्ववादी समीर कुलकर्णी यांची प्रकड मुलाखत झाली या मुलाखतीमध्ये समीर जी कुलकर्णी यांनी जे १७ वर्ष भोगल ते त्यांनी सांगितलं मी ज्या प्रकरणांमध्ये नव्हतोच तर त्या काँग्रेस सरकारच्या नेत्यांनी मला प्रज्ञा साध्वी यांना गोवल गेल आमच्यावर आन्याय अत्याचार खुप केले .

त्यामध्ये सोनिया गांधी राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांनी हा रचलेला डाव होता अशा स्पष्ट शब्दात समीर जी कुलकर्णी यांनी काँग्रेस सरकार व राष्ट्रवादीच्या सरकारवर टीका केली मी जो आज काही बाहेर आहे तो हिंदुत्ववादी सरकारमुळे



आहे मी कोणत्याही पक्षाचा समर्थन करत नाही हिंदू म्हणून सांगत आहे माझ्यावर व प्रज्ञा साध्वी यांच्यावर खूप अन्याय झाला आम्हाला जेलमध्ये मारहाण खूप झाली बॉम्बस्फोट तूच केलास असे मान्य कर व अन्य हिंदुत्ववासाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे नाव घे असे सांगून माझ्यावर खूप मारहाण केली ते मी कदापिही विसरणार नाही मी एवढच सांगेल हिंदू म्हणून प्रत्येक हिंदूने काँग्रेसचे सरकार कधीही आलं नाही पाहिजे यासाठी प्रयत्न करावा कारण काँग्रेस सरकार जर आले तर परत हिंदूंवरती अन्याय होतील अत्याचार



होतील आणि आपल्या पुढच्या पिढीला जे आम्ही भोगलं तेच भोगण्याची वेळ येईल असे मत समिर जी कुलकर्णी यांनी व्यक्त केले या कार्यक्रमात उपस्थित आमदार महेश लांडगे आमदार अमित गोरखे आमदार उमाताई खापरे आमदार अश्विनी जगताप हिंदूत्ववादी नेते मिलिंद एकबोटे शहराध्यक्ष शत्रुघ्नकाटे राहुल कलाटे हे सर्व नेते मंडळी व हिंदुत्ववादी कार्यकर्ते उपस्थित होते ढोल ताशा च्या गजरात व हिंदूत्वाच्या घोषणा देत फुलांचा वर्षाव करत समिर जी कुलकर्णी यांचे स्वागत केले.



**पुणे : पिंपरी चिंचवड रामकृष्ण मोरे सभागृह येथे भगवा आतंकवाद हिंदुत्वाचा या कार्यक्रमा प्रसंगी हिंदुत्वनेते गोरक्षक मिलिंद जी एकबोटे यांनी दैनिक राज्य लोकतंत्र शी सवांद साधुन हिंदूत्वाचे विचार मांडले हिंदूंनी एकजुटीने राहिले तर हिंदू जगेल टिकेल हिंदू चे अस्तित्व राहिल आसे मत मिलिंद एकबोटे यांनी व्यक्त केले**

# अरुण गवळीचा पीए बोलतोय, ५ कोटी दे; पुण्यातील भुरट्या गँगचा प्लॅन पोलिसांनी उधळला

पुणे । प्रतिनिधी

अंडरवर्ल्ड डॉन अरुण गवळी यांचा 'पी.ए.' असल्याचे भासवून तब्बल ५ कोटी रुपयांची खंडणी मागणाऱ्या एका तोतया गँगचा पुणे पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. गुन्हे शाखा आणि लष्कर पोलिस ठाण्याच्या पथकाने संयुक्त कारवाई करत तिघांना रंगेहाथ पकडले. या गँगने थेट व्यावसायिकाला फोन करून 'डॅडी'च्या नावाने पैसे मागितले होते.

५ कोटींच्या खंडणीचा प्रयत्न

याबाबत ४९ वर्षीय व्यावसायिकाने पोलिसांकडे फिर्याद दिली होती. फिर्यादीनुसार, फिर्यादीला फोन करून समोरच्या व्यक्तीने स्वतःला अरुण गवळी यांचा खाजगी सचिव म्हणजेच 'पी.ए.' असल्याचे सांगितले. त्यानंतर 'डॅडींना कामासाठी पैसे हवेत' असे सांगत थेट ५ कोटी रुपयांची मागणी करण्यात आली.



पैसे न दिल्यास गंभीर परिणाम भोगावे लागतील, अशी धमकीही देण्यात आली.

पोलिसांची सापळा रचला पण आरोपी फरार

व्यावसायिकाने त्वरित पोलिसांकडे धाव घेतली. त्यानंतर गुन्हे शाखा आणि लष्कर पोलिस ठाण्याच्या पथकाने सापळा रचला. ठरल्याप्रमाणे आरोपींना पैसे देण्यासाठी बोलावण्यात आले. त्याचवेळी पोलिसांनी कारवाई करून तिघांना घटनास्थळीच पकडले. या कारवाईदरम्यान काही आरोपी मात्र फरार होण्यात यशस्वी झाले असून त्यांचा शोध सुरू आहे.

पोलिस आरोपींकडून आणखी चौकशी करून त्यांचे पार्श्वभूमी, पूर्वीचे गुन्हे, तसेच खऱ्या अर्थाने त्यांचा अरुण गवळी यांच्याशी काही संबंध आहे का, हे शोधून काढण्याचा प्रयत्न करत आहेत. पोलिसांनी अशा प्रकारच्या तोतया गँगपासून सावध राहण्याचे नागरिकांना आवाहन केले आहे. कोणीतरी स्वतःला प्रसिद्ध व्यक्तीचा नातेवाईक, सचिव किंवा प्रतिनिधी असल्याचे सांगून पैशांची मागणी करत असेल, तर त्वरित पोलिसांकडे तक्रार नोंदवावी, असेही पोलिसांनी स्पष्ट केले.

# पुण्यातील जुगाराच्या अड्ड्यावर पोलिसांचा छापा, भाजप पदाधिकाऱ्याला रंगेहाथ पकडलं, राजकीय वर्तुळात खळबळ

जुगार खेळताना भाजप पदाधिकाऱ्याला पोलिसांनी रंगेहाथ पकडलं

मिळालेल्या माहितीनुसार, पुणे पोलिसांनी जुगार अड्ड्यावर छापा टाकला. यावेली जुगार खेळताना भाजपचा पदाधिकारी आढळून आला. जुगार खेळताना भाजप पदाधिकाऱ्याला पोलिसांनी रंगेहाथ पकडलं आहे. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेची आणि सहकारनगर पोलिसांनी ही छापेमारी केली होती, औदुंबर विठ्ठल कांबळे असे या भाजपच्या पदाधिकाऱ्याचे नाव आहे. कांबळे याच्यासोबत इतर २ ते ३ जण जुगार खेळत असताना पोलिसांनी ही कारवाई केली आहे. सहकारनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुणे । प्रतिनिधी

पुण्यात रेव्ह पार्टीनंतर आता पोलिसांनी जुगार अड्ड्यावरती मोठी कारवाई केली आहे. काल (सोमवारी) जुगार अड्ड्यावर पुणे पोलिसांनी छापा टाकत कारवाई केली. यावेळी अड्ड्यावरती जुगार खेळताना एका भाजप पदाधिकाऱ्याला पोलिसांनी रंगेहाथ पकडलं आहे. या प्रकरणी भाजप पदाधिकाऱ्यासह २ ते ३ जणांना पोलिसांनी ताब्यात घेतलं. या सर्वांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भाजप पदाधिकाऱ्याला पकडण्यात आल्यामुळे पुण्यात खळबळ उडाली आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस करत आहेत.

जुगार खेळताना भाजप पदाधिकाऱ्याला पोलिसांनी रंगेहाथ पकडलं

मिळालेल्या माहितीनुसार, पुणे पोलिसांनी जुगार अड्ड्यावर छापा



टाकला. यावेली जुगार खेळताना भाजपचा पदाधिकारी आढळून आला. जुगार खेळताना भाजप पदाधिकाऱ्याला पोलिसांनी रंगेहाथ पकडलं आहे. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेची आणि सहकारनगर पोलिसांनी ही छापेमारी केली होती, औदुंबर विठ्ठल कांबळे असे या भाजपच्या पदाधिकाऱ्याचे नाव आहे. कांबळे याच्यासोबत इतर २ ते ३ जण जुगार खेळत असताना पोलिसांनी ही कारवाई केली आहे. सहकारनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पर्वती विधानसभा मतदारसंघाचा चिटणीस

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, औदुंबर कांबळे हा पर्वती विधानसभा मतदारसंघाचा चिटणीस म्हणून कार्यरत आहे. कांबळे त्याच्या इतर दोन ते तीन सहकाऱ्यांसोबत तळजाई परिसरात असणाऱ्या एका रिकाम्या कारखान्यात रमी खेळत होता. यावेळी सहकार नगर पोलीस आणि गुन्हे शाखेच्या युनिट दोनने छापा टाकला असता ते सर्वजण जुगार खेळत असल्याचे आढळून आले. या सर्वांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून सहकारनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

डाव रंगात आला असतानाच पोलिस

पोलिसांनी सांगितले की, औदुंबर कांबळे आपल्या इतर दोन ते तीन सहकाऱ्यांसोबत तळजाई परिसरात असणाऱ्या एका रिकाम्या कारखान्यात जुगार खेळत बसला होता. यावेळी सहकार नगर पोलिस आणि गुन्हे शाखेच्या युनिट २ने छापा टाकला. त्यावेळी हे सर्वजण जुगार खेळत असल्याचे आढळून आले. डाव रंगात आला असतानाच पोलिस त्याठिकाणी पोहचले आणि सर्वांच्या चेहऱ्यावरचे रंग उडाला. या सर्वांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून सहकारनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेनं परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

# बारामतीच्या डॉ. महाजन दाम्पत्याला स्वातंत्र्यदिनी दिल्लीत विशेष निमंत्रण; आयुष मंत्रालयाकडून होणार सन्मान

बारामती । प्रतिनिधी

बारामतीतील डॉ. निलेश महाजन व त्यांच्या पत्नी डॉ. भक्ती महाजन यांना भारत सरकारच्या आयुष मंत्रालयातर्फे दिल्लीमध्ये होणाऱ्या येत्या स्वातंत्र्यदिनाच्या समारंभामध्ये उपस्थित राहण्यासाठी विशेष अतिथी म्हणून निमंत्रण देण्यात आले आहे.१३ तारखेपासून ते १७ तारखेपर्यंत त्यांना या समारंभामध्ये आमंत्रित केले आहे. १५ ऑगस्टच्या कार्यक्रमानंतर मोरारजी देसाई राष्ट्रीय योग संस्थान, योग प्रमाणीकरण मंडळ, अखिल भारतीय आयुर्वेद संस्थान याठिकाणी जाऊन ते येथील कार्यपद्धतीचा, योगशिक्षणाच्या नवीन संकल्पनांचा अभ्यास करणार आहेत. आयुष मंत्रालयातर्फे दिल्लीमधील विविध पर्यटन स्थळांना भेट देण्याचेही नियोजन असणार आहे. अशा प्रकारचे आमंत्रण मिळणारे वैद्यकीय क्षेत्रातील ते पहिले दाम्पत्य आहे.



बारामती, पुणे शहरामध्ये डॉ महाजन दाम्पत्य हे योग व आयुर्वेद प्रचार व प्रसाराचे कार्य करीत आहेत. उभय दाम्पत्यांनी बारामतीत योग महाविद्यालया स्थापना केली आहे, त्याद्वारे योगशास्त्राचे शास्त्रोक्त प्रशिक्षण देण्यात येते. आयुर्वेद क्षेत्रातही कुशल मनुष्यबळ उपलब्ध होण्यासाठीही आयुर्वेदिक पंचकर्माचे कोर्से सुरु करून रोजगार निर्मितीसाठी हातभार लावला आहे.त्यांचे अनेक विद्यार्थी विविध सरकारी, खाजगी संस्थांमध्ये योगशिक्षक म्हणून कार्यरत आहेत. विविध मोफत योगशिबिरांच्या माध्यमातून उभय दाम्पत्य सामाजिक भान जपून आरोग्यसेवा देत आहेत. योगशास्त्रात संशोधन व नाविन्यपूर्ण संकल्पनेतुन विविध कार्यक्रमाद्वारे समाज प्रबोधनाचे, तसेच आरोग्या विषयी जनजागृतीचे कार्य सुरु आहे.आयुष मंत्रालयाच्या योग प्रमाणीकरण मंडळातर्फे त्यांच्या संस्थेला मान्यता मिळाली आहे. बारामतीसारख्या ग्रामीण भागामध्ये अशा प्रकारे मान्यता मिळवणारी त्यांची हि पहिली संस्था आहे. विविध मान्यता प्राप्त पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले आहे. उभयतांच्या योग क्षेत्रात केलेल्या कार्याची दखल घेऊन आयुष मंत्रालयातर्फे त्यांना स्वातंत्र्य दिनाच्या विशेष कार्यक्रमासाठी विशेष अतिथी म्हणून निमंत्रण देण्यात आले आहे. विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन आणि कौतुक होत आहे.

# अंगारक चतुर्थीला लाखो भाविकांनी घेतले श्री विघ्नहर गणपतीचे दर्शन

ओझर । प्रतिनिधी

**अष्टविनायकांपैकी एक प्रमुख तीर्थक्षेत्र असलेल्या श्री विघ्नहर गणपती मंदिरात आज मंगळवारी (दि. १२ ऑगस्ट २०२५) अंगारक चतुर्थी निमित्ताने लाखो भाविकांनी श्री गणपतीचे दर्शन घेतले. पहाटे ४ वाजता मंदिराचे दार उघडण्यात आले आणि भाविकांनी दर्शनासाठी रांगा लावल्या.**

श्री विघ्नहर गणपती देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष बाळकृष्ण कवडे, उपाध्यक्ष तुषार कवडे, सचिव सुनील घेगडे, खजिनदार दत्तात्रय कवडे यांच्यासह विश्वस्त विनायक मांडे, संतोष कवडे, प्रकाश मांडे, समीर मांडे, विनायक जाधव, गोविंद कवडे, विलास कवडे आणि शिल्पा जगदाळे यांच्या शुभहस्ते श्रींना महाअभिषेक पूजा संपन्न झाली. यावेळी ट्रस्टतर्फे गणेशयागाचे आयोजन करण्यात आले होते. महाआरतीचा मान ज्योती मेटे, शेखर



कानडे, अनिल पठारे, शीतल कदम, विनायक जठार, हेमंत जुईकर, रमेश जाधव, स्वप्नील पवार, जयेश घाडगे, लक्ष्मण विधाटे, प्रतिभा पाटील आणि अभिजित काजळे यांना मिळाला. या सर्वांचे आभार ट्रस्ट अध्यक्ष बाळासाहेब कवडे यांनी मानले.

पहाटे ५ ते सकाळी ११ वाजेपर्यंत सुमारे तीन लाख भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला. मंदिरात फुलांची आरास आणि श्री विघ्नहराला रेशमी जरीचा पोशाख व सोन्याचे अलंकार परिधान करण्यात आले होते. सकाळी ७ आणि दुपारी १२ वाजता मध्यान्ह आरती झाली, तर सकाळी ८ वाजता नियमित पोथी वाचन झाले. सकाळी १०:३० वाजता श्रींना नैवेद्य दाखवून भाविकांना खिचडी वाटप करण्यात आले.

भाविकांसाठी दर्शनरांग, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, अभिषेक व्यवस्था, देणगी कक्ष, शमी वृक्षाखाली अभिषेकाची सोय, विसाव्यासाठी विघ्नहर उद्यान, चप्पल स्टँड, पार्किंग आणि मुखदर्शन व्यवस्था यासारख्या सुविधा ट्रस्टने उपलब्ध करून दिल्या. सायंकाळी ७ वाजता नियमित हरिपाठ, तर चंद्रोदयापर्यंत ह.भ.प. ओंकार महाराज मनसुख खिल्लारवाडी यांचे हरिकीर्तन. त्यांना राम प्रसादिक भजनी मंडळ, शिरोली यांची साथसंगत. रात्री १०:३० वाजता शेजारतीनंतर ११ वाजता मंदिर बंद.

आजच्या अंगारक चतुर्थीला लंबोदर भालचंद्र रवळे यांनी अन्नदान केले. तसेच, ज्योती मेटे, शेखर कानडे, अनिल पठारे, विजय सातव आणि प्रचीती धुरी यांनी ट्रस्टला देणगी दिली. उद्योजक सुरेंद्र वाधवा, हेमंत राजमाने आणि महेश गोरडे यांनीही श्री विघ्नहराचे दर्शन घेतले. भाविकांचे स्वागत आणि गर्दीचे नियोजन ट्रस्टचे व्यवस्थापक आणि कर्मचारी यांनी यशस्वीपणे केले.

# रोहित पवार अत्यंत खोटारडा माणूस; व्हॉईस ऑफ देवेंद्र स्पर्धेवरुन पलटवार, आमदारांनीही शेअर केलं पत्र

पुणे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त व्हॉइस ऑफ देवेंद्र ही राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. मात्र, पुणे विद्यापीठातील एनएसएस विभागाच्या प्राचार्यांना या स्पर्धेत सहभागी होण्याचे पत्र पाठविण्यात आल्याने, तसेच पुणे विद्यापीठानेच ही स्पर्धा भरवल्याचा आरोप करत आमदार रोहित पवार यांनी पुणे विद्यापीठातील प्रशासनावर जोरदार हल्लाबोल केला. त्यानंतर, आता स्पर्धेच्या आयोजकांनी रोहित पवारांच्या टीकेला प्रत्युत्तर दिलं आहे. स्वारंभ फॉउंडेशन, नाशिक प्रतिष्ठान व आय-फेलोज फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा पुणे विद्यापीठाने (झींपश ींपळींशींीळीूं) आयोजित केली नसून रोहित पवार खोटारडा माणूस आहे, असेही स्पर्धेच्या आयोजकांनी म्हटले आहे.

दरम्यान, रोहित पवारांनी देखील पुन्हा ट्विट करुन विद्यापीठाचा दुटप्पीपणा असल्याचे म्हटले आहे.



'व्हाईस ऑफ देवेंद्र' या वक्तृत्व स्पर्धेत सहभागी होण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून परिपत्रक जारी करण्यात आलं आहे. त्यावरुन राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी टीका केली आहे. आता, रोहित पवार यांच्या टीकेला आयोजकांनी प्रत्युत्तर दिलं आहे. 'व्हाईस फ देवेंद्र' स्पर्धेबाबत आयोजकांकडून माहिती देण्यात आली असून ही स्पर्धा पुणे विद्यापीठाने आयोजित केली नसल्याचं त्यांनी म्हटलं आहे. रोहित पवार अत्यंत खोटारडा माणूस आहे, ट्विट करुन ते खोटी माहिती महाराष्ट्राला देत आहेत. ही स्पर्धा पुणे विद्यापीठानी भरवलेली नाही. तर, विविध सामाजिक संघटनांनी एकत्र येत व्हॉईस ऑफ देवेंद्र यांच्या नावाने वक्तृत्व स्पर्धा भरविण्यात आल्याचं या स्पर्धेचे समन्वयक वैभव सोलनकर यांनी म्हटलं आहे. तसेच, शरदचंद्र पवार यांच्या नावाने तुम्ही विद्या प्रतिष्ठान, शारदा प्रतिष्ठान आणि रयत शिक्षण संस्थेत स्पर्धा आयोजित करता, तेव्हा तुम्हाला हे दिसत नाही, असा सवालही सोलनकर यांनी उपस्थित केला आहे. दरम्यान, रोहित पवारांनी आणखी एक ट्विट करत, पुणे विद्यापीठाचा हा दुटप्पीपणा असल्याचं म्हटलं आहे.

पत्र मागे घेण्याची उपरती

'व्हाइस ऑफ देवेंद्र' या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेला झालेल्या विरोधानंतर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला आपलं पत्र मागं घेण्याची उपरती झाली. पण 'एकीकडं व्हाइस ऑफ देवेंद्र' राज्यस्तरीय वकृत्व स्पर्धेचं सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने आयोजन केलं नाही असं म्हणायचं आणि दुसरीकडं राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत काढलेलं पत्र मागे घ्यायचं, हा विद्यापीठाचा दुटप्पीपणा आहे. अशी डबल ढोलकी वाजवून छुप्या पद्धतीने आपला राजकीय अजेंडा राबवणं, योग्य नाही, असे रोहित पवार यांनी ट्विट करुन म्हटलं आहे. तसेच, शिक्षणाचं मंदिर असलेल्या विद्यापीठांच्या माध्यमातून राजकीय अजेंडे राबवण्याचा विषय हा केवळ या स्पर्धेपुरता मर्यादित नाही तर असे अनेक विषय आहेत, महिन्याअखेरपर्यंत विद्यापीठातील या राजकीय अजेंड्यांच्या संदर्भातील सर्व विषयांची पोलखोल करू, असा इशारा देखील रोहित पवार यांनी दिला आहे.

# पुण्यात होणार अत्याधुनिक वाहतूक प्रशिक्षण केंद्र

पुणे । प्रतिनिधी

पुणे शहर पोलिस आयुक्तालयात लवकरच अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज वाहतूक प्रशिक्षण अकादमी सुरू होणार आहे. ही संस्था फक्त पोलिस अधिकारी व कर्मचारी यांनाच नव्हे, तर सर्वसामान्य व्यक्ती, शालेय विद्यार्थी आणि स्कूलबस चालकांनाही वाहतूक व्यवस्थापन व नियमांचे प्रशिक्षण देणार आहे, अशी माहिती पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली.राज्यातील ही दुसरी वाहतूक प्रशिक्षण अकादमी असून, पुणे शहर, पिंपरी-चिंचवड आणि पुणे ग्रामीण भागातील पोलिस अधिकारी व कर्मचार्यांना येथे प्रत्यक्ष साधनसामग्रीसह, अत्याधुनिक पद्धतीने प्रशिक्षण दिले जाणार आहे.



वाहतूक समस्यांवर दीर्घकालीन उपाय -

शहरातील वाढत्या वाहतूक समस्येवर उपाय शोधण्यासाठी आय.टी.एम.एस. उपक्रमांतर्गत ही अकादमी स्थापन होत आहे. येथील प्रशिक्षणात वाहतूक कायदे, नियमांची अंमलबजावणी, नागरिकांशी संवाद, तसेच रस्त्यावर सुरक्षित कामकाज या सर्व बाबींचा समावेश असणार आहे.

नियम मोडणाऱ्यांची शाळा..

वाहतूक नियमांचे वारंवार उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांनादेखील येथे ठराविक कालावधीचा अभ्यासक्रम पूर्ण करावा लागेल. यामुळे केवळ जागरूकता नव्हे, तर जबाबदारीची जाणीवही वाढेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुणे दौर्यात पोलिस आयुक्तांनी या अकादमीचा प्रस्ताव मांडला. त्याला तत्काळ मान्यता देऊन येरवडा येथे जागा निश्चित करण्यात आली आहे.पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पुणे ग्रामीण भागातील वाहतूक व्यवस्थापनासाठी ही संस्था देशात गुणवत्तेवर आधरित एक उत्तम आदर्श ठरेल.

-अमितेश कुमार ( पोलिस आयुक्त, पुणे शहर)